औरंगाबाद, नागपूर, पुणे, अमरावती, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, जळगांव, रत्नागीरी, ठाणे, पालघर, नंदुरबार, नांदेड, चंद्रपूर, गडचिरोली, अहमदनगर, सातारा या विभागातून एकाच वेळी प्रकाशीत होणारे वृत्तपत्र

माहिती खात्रीची व प्रगतीची, देतो वेध भविष्याचा..

# नौकरी एक्सप्रेस

Marathi-Weekly

RNI.No.MAH/MAR2010/34125

छत्रपती संभाजीनगर

पाने : ८

किंमत : १५.००

वर्ष : १६ वे

अंक : १० वा

रविवार -२५ ऑक्टोबर ते नोव्हेंबर २०२५

E-mail:naukriexpress.impact@gmail.com

E-Paper : http://naukriexpress.co.in

Post Regd.No. G 2/RNP/AGD-415/2024-26

किंमत १५/-

सविस्तर वृत्त पान २/३ वर पहा..

राज्यसेवा पूर्व परीक्षा २०१९ - Paper 1

पगार ६७ हजार असेल, इतक्या जागा भरल्या जातील

देशातील २२ विद्यापीठे बोगस

दरवर्षी १ लाख ८८ हजार नोकऱ्या मिळणार

यूनेस्कोमध्ये काम करण्याची भारतीय तरुणांना मोठी संधी

सविस्तर वृत्त पान ४ वर पहा..

पोलिस भरती येऊन गेलेले सराव पेपर

क्रीडा शिक्षकांच्या जागा लवकरच भरणार–क्रीडामंत्री कोकाट

UCO बँकेत ५०० पेक्षा अधिक जागा करीता भरती

रेल्वेमध्ये अप्रेंटिस बंपर भरती!

शिक्षक होऊ इच्छिणाऱ्यांसाठी सुवर्णसंधी! CBSE कडून CTET 2026 ची अधिसूचना प्रसिद्ध

सविस्तर वृत्त पान ७/८ वर पहा..

'प्रधानमंत्री मत्स्य संपदा' योजनेअंतर्गत खोल समुद्रातील मासेमारी नौकांचे उद्घाटन

TA च्या 'या' रॅली कमांडो भरती

जेईई मुख्य परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी आधार आणि प्रमाणपत्र नाव जुळण्याचे पर्याय उपलब्ध

मेडिकल क्षेत्रात करिअर घडवायचे आहे?

OBC समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण रोजगाराची उत्तम संधी

सविस्तर वृत्त पान ८ वर पहा..

नौकरी एक्सप्रेस घरपोच योजना

२०२६ च्या एमपीएससी परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीरा!

राज्यातील ८ महाविद्यालये बंद होण्याची शक्यता

बारावीच्या बोर्ड परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ, दहावीच्या तारखाही वाढण्याची शक्यता

# ..'या' पोलिस कॉन्स्टेबल ७५६५ जागांसाठी मुदतवाढ

**नौकरी एक्सप्रेस**

**दिल्ली/प्रतिनिधी/** कर्मचारी निवड आयोगाने हा निर्णय घेतला असून, ऑनलाइन अर्ज करण्याची नवीन अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर २०२५ दिल्ली पोलिस मध्ये कॉन्स्टेबल (कार्यकारी) पुरुष आणि महिला परीक्षा २०२५ साठी ऑनलाइन अर्ज करण्याची अंतिम तारीख वाढवण्यात आली आहे.

कर्मचारी निवड आयोगाने हा निर्णय घेतला असून, ऑनलाइन अर्ज करण्याची नवीन अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर २०२५ (रात्री ११ वाजेपर्यंत) असेल. यापूर्वी अर्ज करण्याची अंतिम मुदत २१ ऑक्टोबर २०२५ होती. या भरतीअंतर्गत कॉन्स्टेबल पुरुष व महिला तसेच माजी सैनिक श्रेणींमध्ये एकूण ७,५६५ पदांवर भरती केली जाणार आहे.



**पात्रता-**मान्यताप्राप्त बोर्ड किंवा संस्थेकडून १०+२ (इंटरमीडिएट) पास असणे अनिवार्य. (विशेष पदांसाठी/दिल्ली पोलिस कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी ११वी पास देखील मान्य.)

**वय-**किमान १८ वर्षे आणि जास्तीत जास्त २५ वर्षे. (जन्म २ जुलै २००० पूर्वी आणि १ जुलै २००७ नंतर नसावा). आरक्षित वर्गांना नियमांनुसार वयात सवलत.

ड्रायव्हिंग लायसन्स (पुरुषांसाठी) पीई आणि एमटी (Physical Efficiency Measurement Test) च्या वेळी कार किंवा मोटरसायकल चालवण्याचा वैध परवाना असणे आवश्यक.

अर्ज शुल्क आणि वेतन- दिल्ली पोलिस कॉन्स्टेबल (एग्जीक्यूटिव) भरती २०२५ साठी अर्ज शुल्क १०० रुपये ठेवले आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला आणि झुऊ उमेदवारांना अर्ज शुल्क देण्याची गरज नाही. निवड झालेल्या उमेदवारांना पे-लेवल-३ नुसार २१,७०० रुपये ते ६९,१०० रुपये इतके वेतन मिळेल. यासोबतच महागाई भत्ता (DA), घरभाडे भत्ता (HRA) आणि इतर सुविधा देखील मिळणार आहेत.

अर्ज कसा करावा

**उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज व अधिक माहिती करीता** ssc.gov.in **या संकेत स्थळास भेट द्या.**

आपले नाव, ईमेल, मोबाईल नंबर आणि आधार/ओळख तपशील भरून नोंदणी करावी.

ऑनलाइन अर्ज फॉर्म भरावा आणि वैयक्तिक माहिती, शैक्षणिक पात्रता, वय, श्रेणी इत्यादी अचूकपणे नमूद करावी.

पासपोर्ट आकाराचा फोटो, स्वाक्षरी, शैक्षणिक प्रमाणपत्रे आणि इतर आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

निर्धारित शुल्क ऑनलाइन माध्यमातून (BHIM² UPI, नेट बँकिंग, डेबिट/क्रेडिट कार्ड) भरावे.

फॉर्म सबमिट करून त्याचा प्रिंटआउट काढून घ्यावा.




# होमिओपथी, आयुर्वेद, युनानी अभ्यासक्रमांचे प्रवेश



**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/ महाराष्ट्र आरोग्यविज्ञान विद्यापीठाच्या होमिओपथी, आयुर्वेद आणि युनानी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेची तिसरी यादी आज जाहीर होत आहे. या फेरीत ४२८५ जागा रिक्त आहेत. बीएएमएस, बीएचएमएस आणि बीयूएमएस अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाची प्रक्रिया सुरू आहे.

**'आयुष'च्या ४२८५ रिक्त जागांसाठी यादी**

**पुढील वृत्त पान ३ वर..**

# सोलापूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विविध पदांसाठी भरती

सोलापूर येथील डॉ. वि. म. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात गट ड (वर्ग ४) पदांसाठी महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागामार्फत भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. या भरतीसाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागवण्यात आले असून, एकूण २० रिक्त जागा भरल्या जाणार आहेत. अर्ज करण्याची अंतिम मुदत २० नोव्हेंबर २०२५ आहे. चला तर या भरतीबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊयात.या भरती प्रक्रियेत विविध सामाजिक प्रवर्गांसाठी आरक्षण लागू आहे. भरतीमध्ये अनुसूचित जातींसाठी १३%, अनुसूचित जमातींसाठी ७%, विमुक्त जाती (अ) साठी ३%, भटक्या जमाती (ब) साठी २.५%, भटक्या जमाती (क) साठी ३.५%, भटक्या जमाती (ड) साठी २%, विशेष मागास प्रवर्गसाठी १९%, विमुक्त जातीसाठी २%, इतर मागास वर्गासाठी १०% आणि खुल्या प्रवर्गासाठी २८% जागा राखीव आहेत. महिला, दिव्यांग व्यक्ती, माजी सैनिक आणि प्रकल्पग्रस्तांसाठीही या आरक्षणात तरतुदी करण्यात आल्या आहेत. दिव्यांग व्यक्तींसाठी एक जागा आरक्षित आहे, जी सामाजिक आरक्षण श्रेणीतील गुणवत्तेनुसार भरली जाईल.

**ऑनलाईन अर्ज व अधिक माहिती करीता** https://vmgmc.edu.in **या संकेत स्थळास भैट द्या.**

यामध्ये अल्पदृष्टी, श्रवणदोष, शारीरिक अपंगत्व आणि बौद्धिक अपंगत्व यांसारख्या उपश्रेणींचा समावेश आहे, ज्यासाठी विशिष्ट जागा निश्चित करण्यात आल्या आहेत.

ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया २५ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू झाली असून ती २० नोव्हेंबर २०२५ पर्यंत चालेल. परीक्षा शुल्काचा भरणा करण्याची अंतिम तारीखही २० नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ११:५९ वाजेपर्यंत आहे. परीक्षेची तारीख आणि कालावधी अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केला जाईल आणि प्रवेशपत्राद्वारे उमेदवारांना कळवले जाईल. अर्जाचे शुल्क -खुला प्रवर्ग (अनारक्षित) उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क १००० रुपये आहे, तर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी हे शुल्क ९०० रुपये आहे.




माजी सैनिकांना परीक्षा शुल्कातून सूट देण्यात आली आहे. अर्ज शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

जागांची संख्या बदलल्यास, आरक्षण बदलल्यास, भरती प्रक्रिया रद्द झाल्यास किंवा पुढे ढकलल्यासही शुल्क परत मिळणार नाही.या भरती संदर्भातील सविस्तर माहिती महाविद्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उमेदवारांनी नियमितपणे या संकेतस्थळाला भेट देऊन अद्यतने आणि पुढील घोषणांची माहिती घ्यावी. ही जाहिरात सोलापूर येथील डॉ. वि. म. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील गट ड पदांसाठीची अधिकृत सूचना आहे. ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, आरक्षण धोरणे आणि अधिकृत संकेतस्थळाद्वारे माहिती मिळवण्याचे महत्त्व यावर भर देण्यात आला आहे. ही भरती संबंधित शासकीय नियमांनुसार आणि न्यायालयीन निर्णयांच्या अधीन राहून केली जात आहे. वेतन - या भरतीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी सर्व आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. अर्जामध्ये कोणतीही चुकीची माहिती दिल्यास उमेदवारी रद्द केली जाऊ शकते. अर्ज करण्यापूर्वी सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे. या पदांसाठी वेतनश्रेणी एस-१ असून, ती १५,००० ते ४७,६०० रुपये इतकी आहे. शासकीय सेवेत येण्याची ही एक चांगली संधी आहे. उमेदवारांनी वेळेत अर्ज करून या संधीचा लाभ घ्यावा.

## शासकीय आश्रमशाळेसाठी कंत्राटी शिक्षक पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/आदिवासी विकास आयुक्तालय नाशिक या कार्यालयाच्या आदेशानुसार लातूर, बीड, जालना, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे बाह्यस्रोत संस्था छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था व महाराष्ट्र विकास ग्रुप यांच्यामार्फत तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येणार आहे.




प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातंर्गत एकुण ८ शासकीय आश्रमशाळा असून या आश्रमशाळांमधील प्राथमिक शिक्षक, पदवीधर प्राथमिक शिक्षक व माध्यमिक शिक्षक या रिक्त पदावर (कंत्राटी पदे), पात्र उमेदवारांना अर्ज करण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी अपर आयुक्त नाशिक व ठाणे https://scsmltd.com अपर आयुक्त अमरावती व नागपुर https://mvgcompany.in या लिंकवर अर्ज भरण्याची कार्यवाही दि. २० ते ३१ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत करण्याचे आवाहन अधिक्षक आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## डॉ.अजय चंदनवाले आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरु पद



**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल तथा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलपती आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरु पदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबई येथील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. अजय चंदनवाले यांच्याकडे सोपविला आहे. विद्यापीठाच्या कुलगुरु ले. जनरल (निवृत्त) डॉ. माधुरी कानिटकर यांचा कार्यकाळ समाप्त झाल्यामुळे हे पद रिक्त झाले होते.

# सासऱ्यांना खुश करण्यासाठी किती नोकऱ्या बदलणार?

**ब्रिटनचे माजी पंतप्रधान ऋषी सुनक सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरले आहेत. पंतप्रधानपद सोडल्यापासून ते फक्त राजकीय क्षेत्रातच नाही, तर अनेक वेगवेगळ्या क्षेत्रांत सक्रिय झाले आहेत. याच वर्षाच्या सुरुवातीस त्यांनी जागतिक वित्तीय कंपनी गोल्डमॅन सॅक्स मध्ये वरिष्ठ सल्लागार म्हणून काम सुरु केले, तर आता त्यांनी पत्रकारितेची सुरुवात करून द संडे टाइम्स साठी साप्ताहिक बिझनेस कॉलम लिहिण्यासही सुरुवात केली आहे.**

**सोशल मीडियावर ट्रोलिंग**

**ऋषी सुनक यांचे हे वेगवेगळे काम सोशल मीडिया यूजर्सच्या टीकेचा विषय बनले आहेत. अनेकांनी त्यांना ट्रोल करताना त्यांचे सासरे आणि इन्फोसिस चे सहसंस्थापक नारायण मूर्ती यांचा संदर्भ दिला. ऋषी सुनक हे सर्व काम आपल्या सासऱ्यांना खुश करण्यासाठी करत आहेत अशा सूर सोशल मीडियावर उमटत आहे.**

**नारायण मूर्तींनी याआधी एका चर्चेत म्हटले होते की भारताला जपान आणि चीनसारख्या देशांशी स्पर्धा टिकवायची असल्यास कामाचे तास वाढवावे लागेल. त्यांनी तर अशीही सूचना केली होती की तरुणांनी देशाच्या विकासात हातभार लावण्यासाठी आठवड्याला ७० तास काम करण्यास तयार राहावे. नारायण मूर्तींच्या या वक्तव्यावर मोठा वाद झाला होता आणि मूर्ती यांनाही सोशल मीडियावर चांगलंच ट्रोल व्हावं लागलं होतं.**

**सोशल मीडिया वापरकर्त्यांनी ऋषी सुनक यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारे जोक केले आहेत. काहींनी म्हटले की, पंतप्रधानपद सोडल्यावर सुनक विविध नोकऱ्या स्वीकारून आपल्या सासऱ्यांना खुश ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. एका पोस्टमध्ये म्हटले गेले आहे, 'एनआरएन (NRN) चा जावई असणं सोपं नाही, सरकारी नोकरी सोडल्यावर अनेक नोकऱ्या घेतोय फक्त सासऱ्यांना खुश ठेवण्यासाठी.**

**एका युजरने मजेशीरपणे टिप्पणी केली, 'कदाचित जावई हा आठवड्यातून ७० तास काम करेल याची तजवीज नारायण मूर्ती करत आहेत.' काहींनी तर म्हटले की, 'जर ऋषी सगळ्या नोकऱ्या हाती घेत राहिले तर ब्रिटनच्या नोकऱ्यांवर काय परिणाम होणार?' तर काही लोकांनी विनोदात म्हटलं की, 'या दराने तर ऋषी सुनक अख्ख पेक्षा जास्त नोकऱ्या करणार.'**

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंती निमित्त यंदाचा ३१ ऑक्टोबर रोजीचा 'राष्ट्रीय एकता दिवस'

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी**/भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय एकता दिवस साजरा केला जातो. राष्ट्रीय एकता दिवस भारताची एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे. सरदार पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त यंदाचा राष्ट्रीय एकता दिवस हा विशेष सोहळा ठरेल. यंदाचा उत्सव अनेक प्रकारे आगळा ठरेल आणि तो कायम स्मरणात राहील.


राष्ट्रीय एकता दिनाचा वार्षिक उत्सव देशवासीयांना स्वतंत्र भारताच्या निर्मितीत आणि ५६२ संस्थानांना एकत्र आणून आधुनिक भारताचा पाया रचण्यामध्ये सरदार पटेल यांनी बजावलेल्या महत्वाच्या भूमिकेची आठवण करून देतो. त्यांचे नेतृत्व आणि राष्ट्रीय एकात्मतेप्रति असलेल्या अढळ वचनबद्धतेमुळे, सरदार पटेल यांना राष्ट्रीय एकतेचे शिल्पकार आणि भारताचे लोहपुरुष म्हणून आदरणीय मानले जाते.

यंदाच्या राष्ट्रीय एकता दिनाच्या अनोख्या सोहळ्यात गुजरातमधील नर्मदा जिल्ह्यातील एकता नगर येथे भव्य संचलन आणि सांस्कृतिक महोत्सव आयोजित केला जाईल. संचलनादरम्यान, केंद्रीय सशस्त्र पोलिस दल (सीएपीएफ) आणि राज्य पोलिस दल त्यांचे कौशल्य, शिस्त आणि शौर्य प्रदर्शित करतील. या वर्षी राष्ट्रीय एकता दिनाच्या संचलनमध्ये सीमा सुरक्षा दल (बीएसएफ), केंद्रीय राखीव पोलिस दल (सीआरपीएफ), केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ), इंडो-तिबेटन बॉर्डर पोलिस (आयटीबीपी) आणि सशस्त्र सीमा दल (एसएसबी), तसेच आसाम, त्रिपुरा, ओदिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, जम्मू आणि काश्मीर, केरळ, आंध्र प्रदेश या राज्यांचे पोलीस दल आणि राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी) यांच्या तुकड्यांचा समावेश असेल. या संचलनात घोडदळ आणि उंटांवर स्वार झालेल्या तुकड्या, तसेच देशी कुत्र्यांच्या प्रजाती आणि विविध मार्शल आर्ट्स आणि नि:शस्त्र लढाऊ कवायतींची प्रात्यक्षिके असतील.

या संचलनात महिला पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सहभागही दिसून येईल. पंतप्रधानांना देण्यात येणाऱ्या गार्ड ऑफ ऑनरचे नेतृत्व एक महिला अधिकारी करणार आहे. सीआयएसएफ आणि सीआरपीएफच्या महिला कर्मचारी मार्शल आर्ट्स आणि नि:शस्त्र लढाऊ कवायतींचे प्रात्यक्षिक दाखवतील, यामधून भारताच्या कन्यांचे सामर्थ्य आणि धैर्य प्रदर्शित होईल.

या वर्षीच्या संचलनामध्ये बीएसएफ म्हणजेच सीमा सुरक्षा दलामधील भारतीय श्वान प्रजातीतील कुत्र्यांचा समावेश असलेले 'मार्चिंग' पथक, गुजरात पोलिसांचे अश्वदल, आसाम पोलिसांचा मोटारसायकल 'डेअरडेव्हिल' शो आणि सीमा सुरक्षा दलाचे उंट पथक आणि उंटावर स्वार बँड यांचा समावेश हे यंदाच्या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असतील.

एनसीसी म्हणजेच राष्ट्रीय कॅडेट कॉर्प्सचे छात्र आणि शालेय बँड त्यांच्या लक्षवेधी सादरीकरणाने समारंभाची



शोभा वाढणार आहे. भारतीय हवाई दलाच्या सूर्य किरण पथकाची नेत्रदीपक हवाई प्रात्यक्षिके संचलनाची शान आणखी वाढवणार आहेत.

विविधतेतील एकतेचा संदेश देण्यासाठी, विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे चित्ररथ देखील संचलनाचा भाग असतील. यावर्षीच्या राष्ट्रीय एकता दिनाच्या संचलनामध्ये राष्ट्रीय सुरक्षा दल (एनएसजी), एनडीआरएफ, गुजरात, जम्मू आणि काश्मीर, अंदमान आणि निकोबार बेटे, मणिपूर, महाराष्ट्र, छत्तीसगड, उत्तराखंड आणि पुडुचेरी यांचे १० चित्ररथ असतील, त्यातून विविधतेत एकता संकल्पना प्रतिबिंबीत होईल.

या वर्षीच्या संचलनाला अधिक भव्य बनवण्यासाठी, बीएसएफ, सीआरपीएफ, सीआयएसएफ, एसएसबी, दिल्ली पोलिस, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात आणि जम्मू आणि काश्मीरचे ब्रास बँड देखील सहभागी होतील. या वर्षी संचलनामध्ये सीआरपीएफचे पाच शौर्य चक्र विजेते आणि बीएसएफचे १६ वीरता पदक विजेते सहभागी होतील.

# माहितीचा मौलिक अधिकार

आपल्या देशात नागरिकांना उपलब्ध असलेल्या सर्वात महत्त्वाच्या म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ या कायद्याविषयीच्या जनजागृतीसाठी ६ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत माहिती अधिकार सप्ताह साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने या लक्षवेधी कायद्याविषयी थोडक्यात माहिती

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ हा कायदा आपल्या देशात अंमलात आल्यापासून मुलभूत मानवाधिकाराला महत्त्व प्राप्त झाले. पारदर्शकतेचे नवे पर्व सुरु झाले. या कायद्याला आता २० वर्ष पूर्ण झाली असून अजूनही हा कायदा विकासप्रक्रीयेत अत्यंत महत्त्वाची आणि प्रभावशाली भूमिका बजावत आहे.

माहितीच्या अधिकाराबाबत सर्वप्रथम स्वीडन देशात १७६६ मध्ये 'फ्रीडम ऑफ प्रेस क्ट' पारित करुन माहितीचा अधिकार सर्वप्रथम मान्य करण्यात आला. स्वीडननंतर अमेरिका, डेन्मार्क, फिनलँड, नॉर्वे, फ्रॉन्स, कॅनडा, स्पेन, जपान या देशांनी माहितीच्या अधिकाराचे कायदे केले. संयुक्त राष्ट्रसंघाने देखील त्यांच्या १९४८ च्या आमसभेच्या पहिल्या अधिवेशनात युनिव्हर्सल डिक्लेरेशन ऑफ ह्यूमन राईटसची घोषणा करुन नागरिकांना माहिती मिळवण्याचे स्वातंत्र्य हा मूलभूत मानवाधिकार असल्याचे आपल्या ठरावात संमत केले.

अधिकाराने जगभर पारदर्शकतेचे नवे पर्व सुरु केले आहे. विविध देशात झालेल्या अशा कायद्यामुळे खुल्या शासन व्यवस्थेच्या प्रक्रियेला गती मिळत आहे. त्याचा एक भाग म्हणून २८ सप्टेंबर, २००२ मध्ये फ्रीडम ऑफ इन्फार्मेशन नेटवर्क या नावाने बल्गेरियामध्ये माहिती अधिकाराने भारलेल्या संघटना व कृतिगटांचे एक नवे कृतिशील संघटन जाळे उभारण्यात आले. तेव्हापासून जगभर माहिती अधिकाराची जागृती वाढावी, तसेच या कायद्याच्या अंमलबजावणीतून विविध देशातील माहिती अधिकार कायद्यामुळे जगभर पारदर्शकतेचे नवे पर्व सुरु झाले व खुल्या शासन व्यवस्थेच्या प्रक्रियेला गती मिळाली. या कायद्याच्या अंमलबजावणीतून पारदर्शकता व उत्तरदायित्वाची संस्कृती गतीमान व्हावी, यासाठी व खुल्या शासन व्यवस्थेसाठीची बांधिलकी व्यक्त करण्यासाठी २८ सप्टेंबर हा जागतिक माहिती अधिकार दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला.

महाराष्ट्र शासनाने देखील २० सप्टेंबर, २००८ च्या शासन निर्णयानुसार २८ सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिवस घोषित केला असून माहितीचा अधिकार कायद्याविषयी जनजागृती व्हावी म्हणून या दिवशी व्यापक प्रमाणात उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

**केंद्रीय माहिती कायदा**

भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १९ (१) (क) मध्ये भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्येच माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे म्हणूनच माहितीचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे मत सर्वोच्च व उच्च न्यायालय यांनी भारतातील विविध न्यायनिवाड्यात व्यक्त केले आहे. भारतात केंद्रीय माहिती अधिकार कायद्याला १५ जून, २००५ रोजी राष्ट्रपतींची मान्यता मिळाली व कायद्यातील काही तरतुदी अंशत: लागू करण्यात आल्या. तर १२ ऑक्टोबर, २००५ पासून या कायद्याची अंमलबजावणी जम्मू काश्मीर राज्य वगळता संपूर्ण भारतात सुरु झाली. त्यानिमित्त ६ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत माहिती अधिकार सप्ताह साजरा करण्यात येतो.

**महाराष्ट्र माहितीचा अधिकार**

केंद्रीय कायदा येण्यापूर्वीच ९ राज्यांनी माहितीचा अधिकार कायदा तसेच ३ राज्यांनी त्यासंबंधीचे विधेयके, कोड बनवण्यास सुरुवात केली होती. राजस्थानातील सामाजिक लेखापरिक्षणाच्या यशस्वी चळवळीपासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रामध्ये माहितीचा अधिकार कायदा-२००२ संमत करण्यात आला. या कायद्यासंदर्भात देश व आंतरराष्ट्रीय पातळीवर बदलत चाललेले वातावरण तसेच ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आंदोलनाच्या माध्यमातून धरलेल्या आग्रहाखातर महाराष्ट्र शासनाने तज्ज्ञ समितीच्या शिफारशीनुसार २००२ मध्ये कायद्यात सुधारणा करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी केली. माहिती अधिकार काही राज्यात पूर्वीपासून अंमलात होता. तथापि, माहिती अधिकाराचा कायदा पारित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.

**माहिती अधिकाराचा उद्देश**

नागरिकांना आवश्यक असलेली माहिती पुरविणे, प्रशासनात शिस्त निर्माण करुन अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीत व कार्यक्षमतेत वाढ करणे, शासन यंत्रणेतील व्यवहारात पारदर्शकता आणणे, भ्रष्टाचाराचे समूळ निर्मूलन व्हावे, प्रशासकीय कार्यपध्दती, नियम व इतर शासकीय कामांमध्ये गैरव्यवहारात वाव राहू नये, शासकीय कार्यपध्दतीबद्दल सामान्य जनतेला सांशकता वाटू नये व त्यांची कामे विनाविलंब, सहजगत्या व्हावीत यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याची निर्मिती झाली.

**कायद्याची विशेषता**

शासनाने आतापर्यंत केलेल्या सर्व कायद्यामागे जनतेचे हीत हाच मुख्य हेतू होता. परंतु इतर सर्व कायदे व माहितीच्या अधिकाराचा कायदा यात मुख्य फरक असा आहे की, हे सर्व कायदे जनतेने पाळावे या अपेक्षेसह शासकीय अधिकाऱ्यांकडून त्यावर देखरेख होत होती. या भुमिकेमुळे जनता दुय्यम ठरत होती. परंतु माहितीचा अधिकार या कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिकाला संसद सदस्याच्या बरोबरीची माहिती प्राप्त करण्याचा अधिकार मिळाला आहे. प्रशासकीय अधिकारी, सार्वजनिक प्राधिकरण, शासकीय कर्मचारी आपले काम प्रामाणिकपणे करतात की नाही हे सर्वसामान्य व्यक्ती पाहू शकणार आहे तर जनतेच्या अपेक्षेला शासकीय अधिकारी पुरे पडतात का याचीही तपासणी शासनाला करता येणार




आहे.

एखादी व्यक्ती जी माहिती मागेल त्याला ती माहिती ठराविक कालावधीत देण्याचे या कायद्यानुसार सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधन असल्यामुळे शासकीय कारभार आपोआपच अधिकाधिक पारदर्शक बनत जाईल. त्यामुळे भ्रष्टाचार आपोआप कमी होऊन राज्यकारभार जनताभिमूख होईल, हेच या कायद्याचे सामर्थ्य आहे.

कायद्यातील तरतुदी

कोणत्याही भारतीय नागरिकाला माहिती मागण्याचा अधिकार आहे. माहिती कोणत्या कारणासाठी हवी आहे, हे उघड करणे बंधनकारक नाही. माहिती मागण्यासाठी साधा अर्ज आणि दहा रुपये शुल्क, जीवित स्वातंत्र्य या संदर्भातील माहिती ४८ तासात देणे बंधनकारक आहे. सर्वसाधारण माहिती देणे अथवा नाकारणे यासाठी सर्वसाधारणपणे ३० दिवसाची मुदत, सहायक माहिती अधिकाऱ्यांकडे दाखल झालेल्या अर्जासाठी ३५ दिवस तर त्रयस्थ व्यक्तींचा संबंध येत असल्यास माहिती पुरवण्यासाठी ४० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यास अथवा मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्यास प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे ३० दिवसात अपिल करता येईल. तेथूनही समाधान न झाल्यास राज्य माहिती आयोगाकडे ९० दिवसांच्या आत दुसरे अपील करता येते. विवक्षित गुप्तवार्ता व सुरक्षा संघटना, मानवी हक्कांचे उल्लंघन इत्यादींशी संबंधित माहिती देता येणार नाही.

जन माहिती अधिकारी म्हणून जिल्हा किंवा तालुकास्तरावर कोणतेही वेगळे कार्यालय नाही. शासनाने प्रत्येक कार्यालयात जन माहिती अधिकारी पदनिर्देशित केले आहेत. आपल्याला ज्या कार्यालयाशी संबंधित माहिती हवी आहे त्या प्रत्येक कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावा. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हा संबंधित कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालयाचा अधिकारी असतो. द्वितीय अपिल दाखल करण्यासाठी शासनाने बृहन्मुंबई, कोकण, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती आणि मुंबई या सर्व विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी आयोगाचे खंडपीठ स्थापन केले आहेत. माहिती आयुक्तांचा निर्णय हा दुसऱ्या अपिलानंतरचा अंतिम निर्णय राहील. या निर्णयाविरुध्द कोणत्याही कोर्टात दावा किंवा खटला दाखल करता येत नाही.

माहितीच्या अधिकाराविषयीचा अर्ज दाखल करताना हव्या असलेल्या माहितीचे वर्णन योग्य रितीने मांडले जाणे अतिशय महत्वाचे आहे. प्रश्नार्थक स्वरुपाची, कारणे विचारणारी माहिती, मुद्दा नसलेले किंवा गैरसमज उत्पन्न करणारे अर्ज फेटाळण्याची शक्यता अधिक असते. एका अर्जात एका विषयाशी संबंधितच माहिती विचारावी. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना ५० पृष्ठापर्यंतची माहिती मोफत देता येते.

महाराष्ट्र शासनाने ई-गव्हर्नन्सला नेहमीच महत्व दिले आहे. इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे माहिती मिळविण्याची इच्छा असलेल्या व्यक्ती व नागरिकांकडून आलेले अर्ज स्विकारण्यासाठी व संबंधित माहिती देण्यासाठी शासनाने ु.ींळेपश्रळपश. ारहरीरीहींीर.सीं.ळप या नावाचे पोर्टल सुरु केले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कायदा अंमलात आल्यापासून त्याचा वापर करणाऱ्यांची संख्या वाढतच असून या कायद्याचा प्रचार व प्रसार यातून नागरिकांना त्यांच्या हक्काची जाणीव होत आहे. कायद्याचा वापर करण्यात महाराष्ट्र देशात अव्वल आहे. अधिकाधिक लोकांनी या कायद्याचा वापर करावा हा शासनाचा उद्देश सफल होत असल्याचे दिसून येते. देशातील अनेक घोटाळे उघडकीस आणण्यामागचा शिल्पकार माहिती अधिकार कायदा आहे. सामाजिक परिवर्तनासाठी माहितीचा अधिकार म्हणजे एक शस्त्र आहे. याचा योग्य वापर व्हावा, ही अपेक्षा.

**-अनिल आलुरकर,**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**अमरावती**

## गुगलचा मोठा निर्णय!

# दरवर्षी १ लाख ८८ हजार नोकऱ्या मिळणार

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** भारत वेगाने डिजिटल जगाकडे वाटचाल करत आहे. आता या दिशेने आणखी एक ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले आहे. आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणममध्ये अमेरिकेनंतरचे सर्वात मोठे डेटा सेंटर स्थापन करण्याची घोषणा गुगलने केली आहे. हा उपक्रम भारताच्या डिजिटलायझेशनमध्ये एक मोठा टर्निंग पॉइंट ठरू शकतो. यामुळं भारतात दरवर्षी लाखो नोकऱ्या निर्माण होणार आहेत.

गुगलची १० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक

आंध्र प्रदेश सरकारने जारी केलेल्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकानुसार, १ गिगावॅट डेटा सेंटर बांधण्यासाठी गुगल अंदाजे १० अब्ज अमेरिकन डॉलर्स (अंदाजे ८८,७३० कोटी) गुंतवणूक करेल. ही गुंतवणूक भारतात डेटा सुरक्षा, क्लाउड सेवा आणि एआय पायाभूत सुविधांना नवीन उंचीवर घेऊन जाईल.

१.१४ लाख कोटी रुपयांच्या एकूण ३० गुंतवणूक प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली, मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांची माहिती

**भारतातील 'या' शहरात करणार ८८ हजार ७३० कोटींची गुंतवणूक**

मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या राज्य गुंतवणूक प्रोत्साहन मंडळाच्या (SIPB) बैठकीत १.१४ लाख कोटी रुपयांच्या एकूण ३० गुंतवणूक प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. या प्रस्तावांमध्ये आयटी, इंधन, पर्यटन, अवकाश, अन्न प्रक्रिया आणि इतर क्षेत्रातील प्रकल्पांचा समावेश आहे. या गुंतवणुकींमुळे राज्यात अंदाजे ६७००० नवीन नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

**भारतातील आतापर्यंतची सर्वात मोठी परकीय गुंतवणूक**

प्रकाशनानुसार, रायडेन इन्फोटेक डेटा सेंटरसाठीचा ८७५२० कोटी रुपयांचा गुंतवणूक प्रस्ताव देशाच्या इतिहासातील सर्वात मोठा थेट परकीय गुंतवणूक (FDI) मानला जातो. मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू म्हणाले, गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी गेल्या १५ महिन्यांत केलेले प्रयत्न आता फळ देत आहेत. राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाच्या नवीन संधी उघडत आहेत. बैठकीत, सरकारने प्रत्येक मोठ्या प्रकल्पासाठी एक विशेष प्रकल्प अधिकारी नियुक्त करण्याचा निर्णय घेतला, जो प्रकल्प राबविण्याची जबाबदारी घेईल.




**गुंतवणूक आणि रोजगार आकडेवारी**

एसआयपीबीच्या आतापर्यंतच्या ११ बैठकांमध्ये, ७ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या गुंतवणूक प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पांमुळे अंदाजे ६.२ लाख नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

गुगलची ही मोठी गुंतवणूक भारताच्या डिजिटल परिसंस्थेसाठी एक मैलाचा दगड ठरेल. विशाखापट्टणममध्ये बांधले जाणारे हे हायपरस्केल डेटा सेंटर भारताला जागतिक डिजिटल पायाभूत सुविधा केंद्र म्हणून स्थापित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

# राज्यातील ८ महाविद्यालये बंद

पान नं.८ वरून...

यंदा ४४ महाविद्यालयांमध्ये निम्मे किंवा निम्म्यापेक्षा अधिक प्रवेश झाले आहेत.

बी. टेक (कृषी अभियांत्रिकी) अभ्यासक्रमांच्या ८४० पैकी ४९८ जागा भरल्या असून, ३४२ जागा रिक्त आहेत. बी. टेक (बायोटेक्नॉलॉजी) अभ्यासक्रमात ९८७पैकी ६४६ जागा भरल्या असून, ३४१ जागा रिक्त राहिल्या आहेत, असे या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

प्रतिसाद कमी का ?

कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. मात्र, अभ्यासक्रमात त्या प्रमाणात बदल झालेले नाहीत.कृषी पदवीधरांना सरकारी नोकऱ्यांची संधी कमी.खासगी क्षेत्रातील रोजगार स्थिर नसल्याने विद्यार्थ्यांचा इतर शाखांकडे कल वाढला.कृषी अभियांत्रिकी, फूड टेक्नॉलॉजी आणि बायोटेक्नॉलॉजीसारख्या विषयांतील अभ्यासक्रम आधुनिक काळाच्या गरजेनुसार अद्ययावत झाले नाहीत.प्रयोगशाळा, संशोधन सुविधा आणि औद्योगिक प्रशिक्षणाची कमतरता यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वासही कमी झाला आहे.

कृषी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया नुकतीच संपली आहे. त्यामुळे कमी प्रवेश झालेली किती महाविद्यालये बंद पडतील, याबाबत आताच काहीही सांगता येणार नाही. येत्या काही दिवसांत प्रवेश प्रक्रियेच्या माहितीचा सखोल अभ्यास करण्यात येईल.

**- वर्षा उंटवाल, महासंचालक,**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद**

# मुंबईच्या 'या' प्रसिद्ध महाविद्यालयात झालंय सतीश शाह यांचे शिक्षण!

मुंबईतील सेंट झेवियर्स कॉलेजमधून पदवी आणि पुणे येथील फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (FTII) मधून अभिनयाचे प्रशिक्षण घेतलेले शाह 'साराभाई vs साराभाई' आणि 'मैं हूँ ना' मधील भूमिकांसाठी विशेष ओळखले जातात.बॉलिवूडचे प्रसिद्ध अभिनेते सतीश रविलाल शाह यांचे निधन झाले आहे. वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांनी शेवटचा श्वास घेतला. किडनी संबंधित आजाराने ते त्रस्त होते, दरम्यान त्यामुळे त्यांचे निधन झाले. 'साराभाई vs साराभाई', 'जिने भी दो यारो' तसेच 'मैं हू ना' या चित्रपटात त्यांनी काम केले आहे.सतीश शाह यांनी आपले पदवी शिक्षण मुंबईतील सेंट झेवियर्स कॉलेज येथे पूर्ण केले. हे कॉलेज त्यांच्या व्यक्तिमत्त्व घडवण्यात आणि अभिनयाची जाण वाढवण्यात महत्त्वाचे ठरले. शिक्षणाच्या काळातच त्यांनी नाटकांमध्ये भाग घेऊन रंगभूमीवरील अनुभव मिळवला.



रंगभूमीवरील सादरीकरणाने त्यांच्या अंगामध्ये अभिनयाची ज्योत तेवत ठेवली.पदवी पूर्ण केल्यानंतर त्यांनी अभिनय क्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय घेतला आणि यासाठी त्यांनी पुणे येथील फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (FTII) मध्ये प्रवेश घेतला. या प्रतिष्ठित संस्थेतून त्यांनी अभिनयाचे औपचारिक प्रशिक्षण घेतले. FTII मध्ये मिळालेल्या मार्गदर्शनामुळे त्यांचा अभिनय अधिक प्रगल्भ झाला आणि पुढील कारकिर्दीसाठी त्यांनी ठोस पाया रचला.सतीश शाह यांचे शालेय शिक्षणही मुंबईतच झाले असले तरी, त्यांच्या शाळेचे नाव सार्वजनिक स्रोतांमध्ये स्पष्टपणे नमूद नाही. मात्र, त्यांच्या सुरुवातीच्या आयुष्यातील शिक्षण आणि मुंबईतील वाढलेले वातावरण यांनीच त्यांचा विनोदी अभिनयाचा स्वभाव घडवला. FTII मधील शिक्षणानंतर त्यांनी मराठी आणि हिंदी चित्रपट तसेच टीव्ही मालिकांमध्ये काम करण्यास सुरुवात केली. त्यांच्या येस बॉस, सराभाई वर्सेस सराभाई आणि मैं हूँ ना सारख्या मालिकांमधील भूमिका आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून आहेत. त्यांच्या शैक्षणिक प्रवासाने दाखवून दिलं की, योग्य शिक्षण आणि प्रशिक्षणामुळे कलाक्षेत्रातही मोठं यश मिळवता येतं.

# 'सीईटी'त दुहेरी संधी! जेईई परीक्षेप्रमाणे जानेवारी-एप्रिल पॅटर्नसह इतर पर्यायांची चाचपणी

**नौकरी एक्सप्रेस**
**मुंबई /प्रतिनिधी/** राज्यातील अभियांत्रिकी, विधी, फार्मसी, एमबीए, अशा महत्त्वाच्या अभ्यासक्रमांसाठी घेतली जाणारी सीईटी आता दोन वेळा होणार आहे. याबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने चाचपणी सुरू केली असून, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडे ( सीईटी कक्ष ) दोन पर्यायांच्या व्यवहार्यतेबाबत अहवाल मागवण्यात आला आहे. अखिल भारतीय स्तरावर अभियांत्रिकी प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या जेईई परीक्षेप्रमाणे ही परीक्षाही जानेवारी आणि एप्रिल अशा दोन सत्रांत घेण्याकडे विभागाचा कल आहे. मात्र, त्या वेळी राज्यातील परीक्षा केंद्रे जेईई परीक्षेसाठी राखीव असल्याने त्या ऐवजी मार्चअखेरीस १५ दिवसांच्या कालावधीतच दोन्ही सत्रे घेण्याचा पर्यायही समोर आहे.

सीईटी कक्षातर्फे राज्यभरात ७३ अभ्यासक्रमांसाठी १९ विविध सीईटी परीक्षा घेतल्या जातात. त्यापैकी अभियांत्रिकी, फार्मसी, एमबीए, विधी अशा काही मोजक्या अभ्यासक्रमांसाठी लाखभरापेक्षा जास्त विद्यार्थी परीक्षा देतात. भौतिक-रसायन-गणित हा गट घेऊन बारावीत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सीईटी आणि या लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा समावेश असणाऱ्या सीईटी दोनदा घेण्याचा विचार असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागातील एका अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

या अभ्यासक्रमांच्या सीईटी उशिरा होत असल्याने स्वयंअर्थसहाय्यित अभ्यासक्रम देणाऱ्या अनेक संस्था विद्याथ्यर्थ्यांना स्वतःकडे आकृष्ट करतात. हे टाळण्यासाठी जानेवारी महिन्यात पहिली सीईटी आणि एप्रिल महिन्यात दुसरी सीईटी घेण्याचा विचार सध्या सरकारदरबारी होत आहे. मात्र, याच काळात संपूर्ण देशभरात




जेईई परीक्षा होत असल्याने परीक्षा केंद्रांची उपलब्धता हा यातील कळीचा मुद्दा आहे. सध्या सीईटी कक्षाकडे स्वतःची परीक्षा केंद्रे नसल्याने परावलंबित्व वाढत असल्याचे या अधिकाऱ्याने सांगितले.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सीईटी कक्षाकडे याबाबत अहवाल मागवला आहे. यंदा जानेवारीत सीईटी जाहीर झाली, तर विद्यार्थ्यांना तयारीसाठी कालावधी कमी मिळेल. पण तरीही २७ जानेवारीच्या आसपास परीक्षा घेण्याबाबत चाचपणी होत आहे. तसेच जानेवारी-एप्रिल पॅटर्न न राबवता मार्चअखेरीसच १५ दिवसांच्या अंतरात दोन सीईटी घेता येतील का, याबाबतही सीईटी कक्षाकडून अहवाल मागवण्यात आल्याचे या अधिकाऱ्याने नमूद केले. आता सीईटी कक्षाकडून अहवाल आल्यानंतरच जानेवारी-एप्रिल की, मार्चअखेरीस १५ दिवसांच्या अंतरात दोन संधी, याचा निर्णय होणार आहे.

परिणाम काय ?

दोन सत्रांमध्ये सीईटीचा पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध झाला, तर त्यांना पहिल्या सत्रातील गुण सुधारण्याची संधी मिळेल. तसेच स्वयंअर्थसहाय्यित अभ्यासक्रमांकडे वळण्याचे त्यांचे प्रमाणही कमी होईल. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशावर काही निर्बंध टाकण्याचा विचारही चर्चेत होता. पण तसे करणे योग्य ठरणार नसल्याने तसा कोणताही निर्णय होणार नसल्याचेही या अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

# यूनेस्कोमध्ये काम करण्याची भारतीय तरुणांना मोठी संधी

आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करण्याची इच्छा असलेल्या भारतीय तरुणांसाठी एक मोठी संधी आहे. युनेस्को (UNESCO) ने पोस्टग्रॅज्युएट आणि पीएचडी विद्यार्थ्यांसाठी इंटरनॅशनल इंटर्नशिप प्रोग्राम जाहीर केलं आहे. या इंटर्नशिपद्वारे निवड झालेल्या उमेदवारांना जागतिक स्तरावर व्यावहारिक अनुभव मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थी आपले शैक्षणिक आणि तांत्रिक ज्ञान आंतरराष्ट्रीय पातळीवर मजबूत करू शकतात.

युवांसाठी जागतिक करिअरची वाट

युनेस्कोचा हा इंटर्नशिप प्रोग्राम विशेषतः पोस्टग्रॅज्युएट आणि पीएचडी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवार careers.unesco.org या अधिकृत वेबसाइटवर जाऊन ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत अर्ज करू शकतात. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे तरुणांना जागतिक कार्यक्षेत्रात व्यावसायिक अनुभव देणे आणि त्यांचे कौशल्य अधिक विकसित करणे आहे.

**पात्रता -** इंटर्नशिपसाठी अर्ज करणाऱ्यांकडे मास्टर्स डिग्री, पीएचडी किंवा त्याच्या समकक्ष उच्च शिक्षण कार्यक्रम असणे आवश्यक आहे.

- जर उमेदवाराने गेल्या १२ महिन्यांत मास्टर्स किंवा पीएचडी पूर्ण केली असेल, तरीही अर्ज करता येईल.
- ग्रॅज्युएट स्तरावरील विद्यार्थी फक्त त्या परिस्थितीत अर्ज करू शकतात, जेव्हा ते सध्या पोस्टग्रॅज्युएट प्रोग्राममध्ये नामांकित असतील किंवा गेल्या १२ महिन्यांत पदवी पूर्ण केली असेल.
- सचिवीय किंवा तांत्रिक पदांसाठी अर्ज करणाऱ्यांनी संबंधित विद्यापीठ किंवा तांत्रिक संस्थेत शेवटच्या वर्षात असणे आवश्यक आहे.




भाषिक आणि तांत्रिक कौशल्य आवश्यक

- उमेदवारांना इंग्रजी किंवा फ्रेंच भाषेचे उत्कृष्ट ज्ञान असणे आवश्यक आहे. मुख्यालयातील सचिवीय पदांसाठी दोन्ही भाषांवर प्रभुत्व आवश्यक असू शकते.
- तसेच चड जषषळलश, त्रेक्सश्रश थौंझीरिलिश यासारख्या ऑफिस सॉफ्टवेअरमध्ये प्रवीणता हवी.
- आंतरराष्ट्रीय वातावरणात टीमवर्क करण्याची क्षमता, उत्तम संवादकौशल्य आणि किमान २० वर्षे वय ही अट लागू आहे.

UNESCO गेल : अर्ज करण्यापूर्वी काय तयारी करावी?

- अर्ज करण्याआधी उमेदवारांनी प्रेरणा पत्र (Motivation Letter) आणि बायोडाटा (CV/Resume) तयार ठेवावा.
- अर्ज प्रक्रिया पूर्णपणे इंग्रजी किंवा फ्रेंच भाषेत असेल. जर कागदपत्रे इतर भाषेत असतील, तर त्यांचे साधे भाषांतर तयार ठेवणे गरजेचे आहे.
- तसेच तुमचा ईमेल आणि फोन नंबर किमान ६ महिने सक्रिय ठेवावा, कारण पुढील संवादासाठी त्यांचा वापर होईल.

ज्या विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर अनुभव घ्यायचा आहे आणि यूनेस्कोसारख्या प्रतिष्ठित संस्थेसोबत काम करण्याचे स्वप्न आहे, त्यांच्यासाठी ही इंटर्नशिप सुवर्णसंधी ठरू शकते.

# होमिओपथी, आयुर्वेद, युनानी पान १ वरुन.....

विद्यार्थ्यांना आता महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी धाव घ्यावी लागणार आहे. रिक्त जागांवर प्रवेश निश्चित करण्याची ही अंतिम संधी आहे. महाराष्ट्र आरोग्यविज्ञान विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सरकारी आणि खासगी महाविद्यालयांकडून राबवण्यात येणाऱ्या होमिओपथी, आयुर्वेद आणि युनानी या विषयांच्या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या फेरीची यादी आज, शनिवारी जाहीर होणार असून त्यानंतर प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालयांमध्ये धाव घ्यावी लागणार आहे.या फेरीसाठी ४२८५ जागा रिक्त असून आतापर्यंत झालेल्या दोन फेऱ्यांमध्ये राज्य कोट्यातील १३,४९५ पैकी ९२१० जागांवर प्रवेश निश्चित झाले आहेत. बॅचलर ऑफ आयुर्वेदिक मेडिसिन अँड सर्जरी म्हणजेच बीएएमएस या अभ्यासक्रमासाठी राज्यातील २२ सरकारी आणि ११७ खासगी अशा एकूण १३९ महाविद्यालयांमध्ये राज्य कोट्यासाठी ९४०६ जागा उपलब्ध होत्या. पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये सरकारी महाविद्यालयांमधील १५२८ पैकी १२२४ जागांवर आणि खासगी महाविद्यालयांमधील ७८७८ जागांपैकी ५७०७ अशा एकूण ६९३१ जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले.आता सरकारी महाविद्यालयांमधील ३०४ आणि खासगी महाविद्यालयांमधील २१७१ अशा २५७५ बीएएमएस अभ्यासक्रमासाठी शिल्लक आहेत. बॅचलर ऑफ होमिओपथिक मेडिसिन अँड सर्जरी म्हणजेच बीएचएमएस या अभ्यासक्रमासाठी राज्यातील एक सरकारी आणि ५४ खासगी अशा ५५ महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. यातील एका सरकारी महाविद्यालयात राज्य कोट्यासाठी उपलब्ध असलेल्या ५४ पैकी २३ जागा भरल्या असून ३१ जागा रिक्त आहेत. खासगी महाविद्यालयांमधील ३६८६ पैकी १९४० जागांवर प्रवेश निश्चित झाले असून १७४६ जागा रिक्त आहेत. त्यामुळे या अभ्यासक्रमाच्या एकूण १७७७ जागा तिसऱ्या फेरीसाठी उपलब्ध आहेत. शिक्षक होऊ इच्छिणाऱ्यांसाठी सुवर्णसंधी! CBSE कडून उढएढ २०२६ ची अधिसूचना प्रसिद्ध; अर्ज कसा करायचा? सविस्तर माहिती बीयूएमएस अभ्यासक्रमाची तीन सरकारी आणि चार खासगी महाविद्यालये आहेत. या ७महाविद्यालयांमध्ये मिळून ३४९ जागा आहेत. त्यापैकी १५३ जागा सरकारी महाविद्यालयांमध्ये असून १९६ खासगी महाविद्यालयांमध्ये आहेत. या जागांपैकी १४२ सरकारी आणि १७४ खासगी जागांवर दुसऱ्या फेरीपर्यंत प्रवेश पूर्ण झाले.तिसऱ्या फेरीसाठी सरकारी महाविद्यालयांमधील ११ आणि खासगी महाविद्यालयांमधील २२ अशा ३३ जागा शिल्लक आहेत.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२५ चे आयोजन!

**नौकरी एक्सप्रेस**
**मुंबई /प्रतिनिधी/** जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२५ हा २७ ऑक्टोबर २०२५ रोजी युवकांचा सर्वांगीण विकास आणि सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे.

२७ ऑक्टोबर २०२५ रोजी, नोंदणी करण्यासाठी युवकांना https://forms.gle/Kmof5ut KSuEqL3P69 हा गुगल फॉर्म भरावा लागणार आहे. इच्छुक युवकांनी दिलेल्या मुदतीत आणि फॉर्मद्वारे लवकरात लवकर नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा घेण्यात यावी.

महोत्सवात युवकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये वक्तृत्व, कथा लेखन, कविता लेखन, चित्रकला, लोकनृत्य, लोकगीत आणि नवोपक्रम (विज्ञान प्रदर्शन) या स्पर्धांचा समावेश आहे. तुम्हाला




जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२५ आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश युवकांचा सर्वांगीण विकास आहे. तसेच भारतीय संस्कृतीचे जतन या माध्यमातून करण्यात येणार आहे. तसेच हा कार्यक्रम सुप्त कलागुणांना प्रोत्सहन देण्यासाठी दरवर्षी जिल्हास्तरावर आयोजित केला जातो. जर तुम्ही या कार्यक्रमात अर्ज करण्यास इच्छुक आहेत तर तुमच्यासाठी एक महत्वाची बातमी आहे. मुळात, फक्त ४ नोव्हेंबरपर्यंत त्या कार्यक्रमासाठी ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. ऑनलाईन अधिकारी प्रा. मार्क धरमाई यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

हा महोत्सव राष्ट्रीय युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाच्या Viksit Bharat Challenge Track या उपक्रमांतर्गत आयोजित केला जात आहे. मुळात, जिल्हास्तरीय युवा महोत्सव हा केवळ एक प्राथमिक टप्पा आहे. यानंतर राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येईल. राष्ट्रीय युवा महोत्सव २०२५-२६ चे राष्ट्रीय आयोजन १० ते १२ जानेवारी २०२६ दरम्यान होणार आहे, याची नोंद आवडेल त्या स्पर्धेमध्ये तुमच्या इच्छेनुसार तुम्ही सहभाग नोंदवू शकता. एकंदरीत, किमान वय १५ वर्षे निश्चित करण्यात आले आहे तर जास्तीत जास्त २९ वर्षे आयु असणारे उमेदवार या कार्यक्रमात नोंदणी करू शकतात. स्पर्धांबाबतची सविस्तर माहिती आणि नियमावली www.dsomumbaicity.blogspot.com या ब्लॉगवर उपलब्ध आहे. तसेच अधिक माहितीसाठी अनिल घुगे (स्पर्धा प्रमुख), जिल्हा युवा महोत्सव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# देशातील २२ विद्यापीठे बोगस

## UGC कडून यादी जाहीर; महाराष्ट्रातील एका विद्यापीठाचा समावेश

**नौकरी एक्सप्रेस**
**मुंबई /प्रतिनिधी/**
उच्च शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या २२ बोगस विद्यापीठांवर विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) कारवाई केली आहे. या विद्यापीठांची यादी जाहीर करण्यात आली आहे. दिल्ली आणि उत्तर प्रदेशात सर्वाधिक बनावट विद्यापीठे आढळली आहेत. महाराष्ट्रातील नागपूर येथील राजा अरेबिक युनिव्हर्सिटीचाही यात समावेश आहे. राज्य सरकारांकडून कारवाईत होत असलेल्या दिरंगाईवर यूजीसीने नाराजी व्यक्त केली आहे.

उच्च शिक्षणाच्या नावाखाली देशभरातील विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या बोगस विद्यापीठांवर विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) पुन्हा कारवाईचा बडगा उगारला आहे. आयोगाने मान्यता नसलेल्या विद्यापीठांची यादी जाहीर केली आहे. त्यात देशभरातील २२ विद्यापीठांचा समावेश असून, त्यापैकी दिल्लीतील १०, तर महाराष्ट्रातील एका विद्यापीठाचा समावेश आहे. वारंवार निर्देश देऊनही या विद्यापीठांवर राज्य सरकारांकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याने 'यूजीसी' ने नाराजी व्यक्त केली आहे.




'यूजीसी'च्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेल्या यादीनुसार, दिल्ली आणि उत्तर प्रदेश या दोन राज्यांमध्ये सर्वाधिक बनावट विद्यापीठे आढळली आहेत. दिल्लीतील एआयपीपीएचएस विद्यापीठ, कमर्शियल युनिव्हर्सिटी लिमिटेड, युनायटेड नेशन्स युनिव्हर्सिटी, वोकेशनल युनिव्हर्सिटी, ए.डी.आर. सेन्ट्रिक जुरीडीकल विद्यापीठ, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ॲण्ड इंजिनियरिंग, विश्वकर्मा ओपन युनिव्हर्सिटी फॉर सेल्फ एम्प्लॉयमेंट, आध्यात्मिक विश्वविद्यालय, डब्ल्यूपीयूएन विद्यापीठ आणि इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड इंजिनियरिंग ही विद्यापीठे मान्यताविना असल्याचे २/२२२४/ी 'यूजीसी'ने स्पष्ट केले आहे.

उत्तर प्रदेशात गांधी हिंदी विद्यापीठ, महामाया टेक्निकल युनिव्हर्सिटी, नेताजी सुभाषचंद्र बोस मुक्त विद्यापीठ आणि भारतीय शिक्षा परिषद या चार संस्थांचा या यादीत समावेश आहे.

केरळमधील सेंट जॉन युनिव्हर्सिटी, इंटरनॅशनल इस्लामिक विद्यापीठ, पश्चिम बंगालमधील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव मेडिसिन आणि इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव मेडिसिन ॲण्ड रिसर्च, आंध्र प्रदेशातील क्राइस्ट न्यू टेस्टामेंट डीम्ड युनिव्हर्सिटी आणि बायबल ओपन युनिव्हर्सिटी, तसेच पुदुच्चेरीतील श्री बोधी ॲकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन या विद्यापीठांचा समावेश यामध्ये आहे. महाराष्ट्रातही नागपूरमधील राजा अरेबिक युनिव्हर्सिटी हे विद्यापीठ बनावट असल्याचे स्पष्ट झाले आहे.

यूजीसी कायदा, १९५६नुसार कोणत्याही शैक्षणिक संस्थेला 'विद्यापीठ' हा दर्जा फक्त आयोगाकडूनच मिळू शकतो. या कायद्याच्या कलम २२(१) नुसार केंद्र, राज्य आणि प्रांतातील शैक्षणिक संस्थांना विद्यापीठाचा दर्जा देण्यात येतो, तर कलम तीन अंतर्गत अभिमत विद्यापीठांना मान्यता दिली जाते. कलम २३नुसार 'विद्यापीठ' हा शब्द विनापरवानगी वापरणे गुन्हा ठरतो, तरीही काही संस्था हा नियम धाब्यावर बसवून पदव्या प्रदान करत असल्याचे आयोगाने नमूद केले आहे. कोणत्याही विद्यापीठात प्रवेश घेण्यापूर्वी त्या संस्थेला आयोगाची मान्यता आहे की नाही, याची खात्री करून घ्यावी, असे आवाहन आयोगाने केले आहे.

**कारवाईचे निर्देश -**

विद्यार्थी आणि पालकांची दिशाभूल होऊ नये, यासाठी 'यूजीसी' दरवर्षी ऑक्टोबरमध्ये या बनावट विद्यापीठांची अद्ययावत यादी जाहीर करते. या संस्थांवर कारवाई करण्याचे निर्देशही राज्य सरकारांना दिले जातात; मात्र, अनेक राज्यांकडून कारवाईस टाळाटाळ होत आहे, याकडे आयोगाने लक्ष वेधले आहे. काही विद्यापीठे गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असून, त्यांच्याविरुद्ध कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. विद्यापीठाचा दर्जा नसतानाही 'विद्यापीठ' शब्दाचा वापर करून विद्यार्थ्यांना फसवले जात आहे. या संदर्भात राज्य सरकारांनी गांभीर्याने लक्ष घालावे आणि तत्काळ कारवाई करावी, असे 'यूजीसी' ने स्पष्ट केले आहे.

# राज्यसेवा पूर्व परीक्षा २०१९ - Paper 1

**१.उपग्रहामध्ये, अंतराळवीर हा वजनरहित अवस्था अनुभवतो कारण**

अ, उपग्रहाच्या आतील पृष्टभागाकडून अंतराळवीरावर प्रयुक्त होणारे बल हे शून्य असते.

ब. अंतराळवीर व उपग्रहाचा पृष्टभाग एकमेकाकडे आकर्षिले जातात.

क. अंतराळवीर हा कोणत्याही गुरूत्वीय बलाने आकर्षिला जात नाही.

ड. वरीलपैकी कोणतेही नाही.

पर्यायी उत्तरे :

१. अ, ब आणि क २. फक्त अ आणि ब

३. फक्त अ आणि क ४. फक्त ड

**२.इलेक्ट्रॉनिक दळणवळण पद्धतीमध्ये (डिजिटल) अंकात्मक संदेश**

अ. सलग संदेश संच पुरवत नाहीत.

ब. स्वतंत्र (विलग) पाय-यांमध्ये सादर केले जातात.

क. बायनरी (द्विमान) संख्यापद्धतीचा उपयोग करतात.

ड. दशमान आणि द्विमान (बायनरी) या दोन्ही संख्यापद्धतींचा उपयोग करतात.

वरीलपैकी कोणती विधाने सत्य आहेत ?

पर्यायी उत्तरे :

१. फक्त अ आणि ब २. फक्त ब आणि के

३. अ, ब आणि क ४. वरील सर्व

३.अणुकेंद्रका भोवली दुसन्या भ्रमणकक्षेत भ्रमण करणा-या इलेक्ट्रॉनची उर्जा - ३.४ शत आहे. त्याची तिस-या भ्रमण कक्षेतील उर्जा किती ?

1. - 1.51J 2. - 3.4eV

3. - 1.51 eV 4. - 13.6 eV

**४.प्रकाशकीय तंतू हा खालीलपैकी कोणत्या तत्त्वावर आधारित आहे ?**

अ. प्रकाशाच्या परावर्तनाचे तत्वावर

ब. प्रकाशाच्या अपवर्तनाचे तत्वावर

क. प्रकाशाच्या पूर्ण आंतरिक परावर्तनाचे तत्वावर

ड. प्रकाशाच्या अपस्करण तत्वावर

पर्यायी उत्तरे :

१. अ, ब आणि क २. फक्त क

३. ब आणि ड ४. फक्त ड

**५.पुढील विधानांचा विचार करा :**

अ. रण भारित बीटा कण हे धन भारित अल्फा कणापेक्षा जास्त अंतर्भेद करतात.

ब. उदासीन (धन अथवा ऋण नसलेले) गामा कण हे बीटा कणापेक्षा जास्त अंतर्भद करतात.

क. सर्वसाधारणपणे उदासीन कणांची (धन अथवा ऋण भारित नसलेले) अंतर्भद शक्ती अत्युच्च असते.

पर्यायी उत्तरे :

१. अ आणि ब विधाने त्रिकालाबाधित सत्य आहेत.

२. अ आणि ब विधाने चूक आहेत परंतु क विधान बरोबर आहे.

३. क विधान हे अ आणि ब ची फलनिष्पती आहे.

४. क विधान हे अ आणि ब ची फलनिष्पती नाही.

**६.दोन वस्तूंच्या अप्रत्यास्थ धड़केच्या दरम्यान खालीलपैकी कोणत्या बांबीचे संवर्धन होईल ?**

advertisement: 0:18
Close PlayerUnibots.com

१. संपूर्ण गतिज उर्जा २. संपूर्ण यांत्रिक उर्जा

३. संपूर्ण एकरेषीय उर्जा ४. प्रत्येक वस्तुची गती

७.कोणत्या जनुकीय रूपांतरीत पीकामध्ये जनुकीय अभियांभिकी तंत्राने अ नीवनसत्त्व निर्माण करणारी तीन जनुके घातली आहेत ?

१. कल्याण सोना गहू २. मधुर ज्वारी

३. संकरीत बाजरी ४. सुवर्ण तांदुळ

**८.नाकतोड़ या किटकाच्या नर आणि मादी मध्ये किनी सहलग्नता गट असतात ?**

१. ०४ आणि ०४ २. १० आणि १०

३. १२ आणि १२ ४. २३ आणि २४

**९.कोणत्या वनस्पतीमध्ये एच.एस.के. अथवा उ४ या प्रकारचे प्रकाशसंश्लेषण होते ?**

१. ऊस

२. भुईमूग

३. सूर्यफुल

४. बटाटा

**१०.रसायनांपासून स्वतःचे अन्न तयार करणारे जीवाणू (स्वयंजीवी) कोणत्या रसायनांचे विघटन करून उर्जा मिळवतात ?**

१. सेंद्रिय द्रव्ये

२. असेंन्द्रिय द्रव्ये

३. कृत्रिम द्रव्ये

४. प्रक्रिया केलेली द्रव्ये

**११. मानवाच्या शरीरातील नॅफ्रोन्स मध्ये युरीन बनविण्याचा योग्य घटनाक्रम कोणता ?**

१. सिलेक्टीव रिॲबसॉर्बशन, ट्युबुलर सिक्रिशन आणि अल्ट्राफिल्ट्रेशन

२. अल्ट्राफिल्ट्रेशन, टयुबुलर सिक्रिशन आणि सिलेक्टीव रिॲबसॉर्बशन

३. अल्ट्राफिल्ट्रेशन, सिलेक्टीव रिॲबसॉर्बशन आणि ट्युबूलर सिक्रिशन

४. टयुबुलर सिक्रिशन, सिलेक्टीव रिॲबसॉर्बशन आणि अल्ट्राफिल्ट्रेशन

१२.खालीलपैकी कोणती परिस्थिती दसच्या गर्भासाठी धोकादायक असेल ?

1. Rh+ nwéf d Rha स्त्री चे विवाह

2. Rha nwéf d Rh+ स्त्री चे विवाह

3. Rh+ nwéf d Rh+ स्त्री चे विवाह

4. Rh- nwéf d Rh- स्त्री चे विवाह

१३.खालील जोड्या जुळवा :

1. 2.

3. 4.

**१४.अनित्य तंतू आणि स्नायु संकुचन सिद्धांता बाबत खालील विधाने लक्षात घ्या :**

अ. हा सिद्धांत आधुनिक स्नायु संकुचन संकल्पना स्पष्ट करतो.

ब. हा सिद्धांत हक्सले आणि निडरजरके या शास्त्रज्ञानी मांडला.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने सत्य आहेत ?

पर्यायी उत्तरे :

१. फक्त अ २. फक्त ब

३. अ आणि ब दोन्ही ४. कोणतेही नाही

१५. कल्सिनेशन प्रक्रियेतून_ बाहेर पडतो.

१. फक्त कार्बनडायऑक्साईड बाहेर पडतो

२. फक्त हैड्रेटमधून पाणी बाहेर पडते

३. (१) किंवा (२) हे धातुकां वर अवलंबुन असते

४. हायड्रोजन सल्फईड बाहेर पडतो

१६.हरित रसायन शास्त्र म्हणजे

१. हरितगृह वायूमुळे दररोजच्या वापरातील रसायने तयार करणे

२. रासायनिक अभिक्रिया हिरव्या वनस्पतीपासून तयार करणे

३. जैविक घटकांपासून अभिक्रिया बनविणे/तयार करणे

४. बिनाविषारी द्रव्ये आणि द्राव्ये वापरुन पर्यावरणपूरक उत्पादने तयार करणे

१७.खालीलपैकी कोणते लुईस आम्ल नाही ?

१. बेरिअम क्लोराईड (इरउश्र२)

२. बोरोन ट्राय क्लोराईड (इउश्र३)

३. बेरिलीअम क्लोराईड (इशउश्र२)

४. बोरोन ट्राय फ्लोराईड (इऋ३)

**१८.खालीलपैकी काही ही कोलायडल सोल्सच्या वैशिष्टे आहेत ?**

अ. टिंडाल परिणाम ब. ब्राउनिअन गती

क. मॅक्सवेल वितरण ड. व्हेंडरवॉल्स बल

पर्यायी उत्तरे :

१. अ, ब आणि क २. अ आणि ब

३. अ आणि क ४. ब आणि ड

**१९.खालील दिलेल्या विधानांपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?**

अ. HF आणि $H_2O$ ही ध्रुविय संयुगे आहेत.

ब. $CH_4$ आणि $CO_2$ ही ध्रुविय संयुगे नाहीत.

क. उज२ आणि डज२ ही ध्रुविय संयुगे नाहीत.

**पर्यायी उत्तरे :**

१. अ आणि ब २. ब आणि क

४. अ आणि क ४. अ, ब आणि क

**२०.खालीलपैकी कोणती अभिक्रियाकारके अमोनिया तयार करण्यासाठी वापरतात ?**

अ. $NH_4Cl + Ca(OH)_2$

ब. $N_2 + H_2$

क. $CaCN_2 + H_2O$

**पर्यायी उत्तरे :**

१. अ आणि ब २. ब आणि क

३. अ आणि क ४. अ, ब आणि क

**२१.भारतीय स्वातंत्र्य कायदा - १९४७ मुळे संविधान सभेच्या स्थानामध्ये झालेल्या बदलाबाबतची खालील विधाने विचारात घ्याः**

अ. संविधान सभा पूर्ण सार्वभौम संस्था बनली.

ब. संविधान सभा ही स्वतंत्र भारताची पहिली संसद बनली.

क. जेंव्हा संविधान सभा विधिमंडळ संस्था म्हणून भरत असे, तेव्हा तिच्या अध्यक्षस्थानी डॉ. राजेन्द्र प्रसाद असत.

ड. संविधान सभेची सदस्य संख्या ३८९ च्या तुलनेने २९९ पर्यंत कमी झाली.

पर्यायी उत्तरे :

१. विधाने अ, ब आणि क बरोबर

२. विधाने ब, क आणि ड बरोबर

३. विधाने अ, ब आणि ड बरोबर

४. विधाने अ, क आणि ड बरोबर

**२२.१९७८ च्या ४४ व्या घटनादुरुस्ती अधिनियमाद्वारे राष्ट्रीय आणीबाणीच्या संदर्भात खालीलपैकी कोणती तरतूद केलेली नाही ?**

१. कॅबिनेटच्या लेखी शिफारशी शिवाय राष्ट्रपती राष्ट्रीय आणीबाणी घोषित करु शकणार नाही.

२. अंतर्गत अशांतता' या ऐवजी सशस्त्र बंडाळी' हा शब्दप्रयोग करण्यांत आला.

३. अनुच्छेद १९ खाली असलेले सहा मूलभूत अधिकार हे केवळ युद्ध अथवा परकीय आक्रमणाच्या कारणास्तव घोषित करण्यांत आलेल्या आणीबाणीत निलंबित करता येतील, सशस्त्र बंडाळीच्या कारणास्तव घोषित करण्यांत आलेल्या आणीबाणीत निलंबित करता येणार नाहीत.

४. जर संसदेच्या कोणत्याही सभागृहाने आणीबाणीच्या घोषणेला विरोध करणारा अथवा आणीबाणी चालू ठेवण्यास विरोध करणारा ठराव कोणत्याही वेळी मंजूर केला तर राष्ट्रपतीने आणीबाणी मागे घेण्याची घोषणा करणे आवश्यक आहे.

**२३.खालील विधाने विचारात घ्या :**

अ. मूळच्या राज्य घटनेत उपराष्ट्रपतीची निवड संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत व्हावी अशी तरतूद होती.

ब. १९६१ च्या ११ व्या घटनादुरुस्तीने उपराष्ट्रपतीच्या निवडीची पद्धत बदलण्यात आली.

क. उपराष्ट्रपतीची निवड दोन्ही सभागृहांच्या केवळ निर्वाचित सदस्यांच्या निवडमंडळाकडून केली जाते.

ड. निवड मंडळ (Electoral College) अपूर्ण होते या कारणास्तव उपराष्ट्रपतीच्या निवडणूकीला आव्हान देता येत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

१. विधाने अ, ब बरोबर, क, ड चूक

२. विधाने ब, क, ड बरोबर, अ चूक

३. विधाने अ, ब, ड बरोबर, के चूक

४.विधाने ब, क बरोबर, अ, ड चूक

**२४.महाराष्ट्राच्या राज्यपालाबाबत खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?**

१. ते अँग्लो इंडियन जमातीमधील एकास विधान परिषदेवर नामनिर्देशित करु शकतात.

२. ते अँग्लो इंडियन जमातीमधील किमान दोघास विधान सभेवर नामनिर्देशित करु शकतात.

३. त्यांना राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७१ (२) अन्वये विशेष जबाबदारी प्रदान करण्यात आली आहे.

४. ते राज्यघटनेच्या अनुच्छेद ३१ - खाली सक्तीने खाजगी मालमत्ता संपादन करण्यासंबंधांचे विधेयक राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवू शकत नाहीत.

२५.खालीलपैकी कोणती बाब जुळत नाही ?

१. २. ३. ४.

**२६.राज्य विधिमंडळाने संमत केलेले विधेयक राज्यपाल राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवू शकतात. राष्ट्रपती**

अ. विधेयकाला मान्यता देतात अथवा मान्यता राखून ठेवू शकतात.

ब. राज्य विधिमंडळाकडे पुर्नविंचारार्थ ते विधेयक परत पाठवू शकतात.

क. राष्ट्रपतीकडून परत आलेल्या विधेयकावर राज्य विधिमंडळाने तीन महिन्यात पुनर्विचार केलाच पाहिजे आणि जर पुन्हा ते विधेयक मंजूर केले तर राष्ट्रपतीवर त्यास संमती देणे बंधन कारक असते.

ड, पुनविचारार्थ परत आलेले विधेयक जर राज्य विधिमंडळाने पुन्हा मंजूर केले तर राष्ट्रपतीने त्यास सहा महिन्यांच्या कालावधीत संमती दिली पाहिजे.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

पर्यायी उत्तरे :

१. अ आणि ब २. अ, ब आणि क

३. अ, ब आणि ड ४. अ, क आणि ड

**२७.भारतात न्यायालयीन पुनर्विलोकन् सुचवते.**

१. कायद्यांची आणि कार्यकारी आदेशांची घटनात्मकता घोषित करण्याचा न्यायालयीन अधिकार

२. कायदेमंडळाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या कायद्यांचे सुज्ञपणा यावर प्रश्न उपस्थित करण्याचा न्यायालयीन अधिकार

३. कायदेशीर मान्यता असलेल्या सर्व बाबींचे राष्ट्रपतीची मान्यता मिळण्याअगोदर पुनरावलोकन करण्याचा न्यायालयीन अधिकार

४. आपल्याच यापुर्वी समान अथवा भिन्न प्रकरणामध्ये दिलेल्या निर्णयाचे पुनरावलोकन करण्याचा न्यायालयीन अधिकार

२८.खालील विधानांपैकी कोणते विधान/ने भारतीय राज्यघटनेत तरतूद म्हणून समाविष्ट केलेली आहेत ?

अ. राज्याचा राज्यपाल म्हणून नियुक्त होणारी व्यक्ति ही भारतीय संघातील इतर दुस-या राज्याची रहिवासी असली पाहिजे.

ब. देशाच्या धर्मनिरपेक्ष वैशिष्ट्याची खात्री देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयातील किमान एक न्यायाधीश हा मुस्लीम असला पाहिजे.

क. संसदेच्या लोकलेखा समितीचा अध्यक्ष हा विरोधी पक्षाचा असला पाहिजे.

पर्यायी उत्तरे :

१. फक्त अ

२. फक्त ब

३. वरीलपैकी एकही नाही

४. अ आणि ब

**२९.खालील विधाने विचारात घ्या :**

अ. नुकताच ओडिशा विधानसभेने विधान परिषद निर्माण करण्याबाबत ठराव मंजूर केला आहे.

ब. सध्या पांच राज्यांना विधान परिषद् आहे.

क. केरळ आणि गुजरात मध्ये विधान परिषद निर्माण करण्यासंबंधीचे प्रस्ताव संसदेमध्ये प्रलंबित आहेत.

ड. विधान परिषदेचे १/१२ सदस्य हे नोंदणीकृत पदवीधरांकडून निवडले जातात.

वरीलपैकी कोणते विधाने बरोबर आहेत ?

**पर्यायी उत्तरे :**

१. अ, ब आणि क २. ब आणि क

३. क आणि ड ४. अ आणि ड

३०.खालीलपैकी कोणते/ती विधान/ने चुकीचे आहे/त ?

अ. लोकसभेत अविश्वास ठराव कोणत्या कारणांवर आधारित आहे, हे स्पष्ट करावे लागते.

ब. लोकसभेत अविश्वास ठराव दाखल करुन घेण्यासंबंधीची पद्धती ही लोकसभेच्या नियम १९८ मध्ये सांगितली आहे.

क. अविश्वास ठराव एकदा दाखल झाल्यावर तो दाखल करण्यास मंजुरी मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत चर्चेस घेतला गेला पाहिजे.

ड. इटली मध्ये सरकारला संसदेच्या दोन्हीही सभागृहांच्या पाठिंब्या ची गरज असते.

पर्यायी उत्तरे :

१. फक्त अ

२. फक्त क

३. ब आणि क

४. अ आणि ड

**३१.भारतीय निर्वाचन आयोगाबाबत खालीलपैकी कोणते विधान चूकीचे आहे ?**

१. केवळ मुख्य निर्वाचन आयुक्तांना आपल्या कार्यकाळाची सुरक्षितता आहे, परंतू इतर निर्वाचन आयुक्तांना तशी सुरक्षितता नाही.

२. मुख्य निर्वाचन आयुक्तांचे स्थान अथवा दर्जा हा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश समान आहे.

३. मुख्य निर्वाचन आयुक्त हे केवळ समानातील प्रमुख आहेत.

४. जर एखाद्या बाबतीत मुख्य निर्वाचन आयुक्त आणि इतर निर्वाचन आयुक्त यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले तर त्या बाबींचा निर्णय बहुमताने घेतला जातो.

**३२.खालील तरतूदी विचारात घ्या :**

अ. भारतीय राज्यघटना अनुच्छेद २१ नुसार कोणत्याही व्यक्तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य कायद्याच्या योग्य प्रक्रियेशिवाय हिरावून घेतले जाणार नाही.

ब. भारतीय राज्यघटना अनुच्छेद २० (२) नुसार कोणत्याही व्यक्तिवर एकाच गुन्ह्यासाठी एकापेक्षा अधिकवेळा खटला चालविली जाणार नाही आणि एकापेक्षा अधिकवेळा शिक्षा दिली जाणार नाही.

क. भारतीय राज्यघटना अनुच्छेद १४ नुसार भारतीय प्रदेशात राज्य कोणत्याही व्यक्तिस कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही.

वरीलपैकी कोणती तरतूद बरोबर नाही ?

पर्यायी उत्तरे :

१. अ २. ब

३. क ४. वरीलपैकी एकही नाही

**३३.खालील विधाने विचारात घ्या :**

अ. भारतीय राज्यघटनेचे अनुच्छेद २ हे भारतीय संघराज्याचा भाग नसलेल्या भू प्रदेशाचा समावेश अथवा त्याची नवीन राज्यांमध्ये स्थापना यासंबंधी आहे.

ब. भारतीय राज्यघटनेचे अनुच्छेद ३ हे अस्तित्वात असलेल्या केन्द्रशासित प्रदेशासह घटक राज्यांच्या स्थापने संबंधी अथवा त्यातील बदलासंबंधी तरतूदी प्रदान करते.

क. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद ३ खाली असलेले विधेयक हे केवळ लोकसभेतच मांडले जावू शकते. वरीलपैकी कोणते विधान/ने योग्य आहेत ?

पर्यायी उत्तरे :

१. वरील सर्व २. अ आणि ब

३. ब आणि क ४. फक्त क

**३४.लोक न्यायालया बाबत खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही ?**

१. कायदेशीर सेवा अधिसत्ता अधिनियम (Legal Services authorities -ct) १९८७ नुसार लोकन्यायालयांना वैधानिक दर्जा दिला गेला.

२. लोकन्यायालयात केवळ सेवेतील अथवा सेवानिवृत्त न्यायिक व्यक्तिंचाच समावेश होवू शकतो.

३. लोकन्यायालयाने दिलेला प्रत्येक निर्णय हा अंतीम असतो आणि तो दोन्ही पक्षांवर बंधनकारक असतो.

४. लोकन्यायालयाने दिलेला निर्णय हा दिवाणी न्यायालयाने दिलेल्या निवाड्यासमान असतो.

**३५.राज्य पुनर्रचना आयोग आणि कायदा या बाबतीत खालील विधाने विचारात घ्या :**

अ. आयोगाची नियुक्ती डिसेंबर १९५३ मध्ये केली होती.

ब. आयोगाच्या प्रमुखपदी फझल अली हे होते आणि आयोगाचे अन्य दोन सदस्य एच.व्ही.कामथ आणि गोविंद वल्लभ पंत हे होते.

क. आयोगाने आपला अहवाल ३० सप्टेंबर, १९५४ रोजी सादर केला.

ड. राज्य पुनर्रचना अधिनियम ३१ ऑगस्ट १९५६ रोजी मंजूर झाला.

ई. राज्य पुनर्रचना अधिनियम १ जानेवारी, १९५७ रोजी अमलात आला.

वरीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत ?

पर्यायी उत्तरे :

१. अ, ब आणि क

२. ब, क आणि ड

३. ब, ड आणि ई

४. अ आणि ड फक्त

३६.एकतेच्या पुतळया बाबत (Statue of Unity) खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?

**१. १८२ मीटर उंच असलेला एकतेचा पुतळा हा न्यूयार्क च्या स्वातंत्र्य देवतेच्या पुतळयापेक्षा** (Statue of Liberty) **आकाराने दुप्पट उंचीचा असेल.**

१. पुतळयाची मिटरमध्ये असलेली उंची ही गुजरातच्या एकूण विधानसभा मतदार संख्येच्या बरोबरीची साधली आहे.

२. ३१ ऑक्टोबर, २०१८ हा दिवस सरदार वल्लभभई पटेल यांचा १४५ वा जन्मदिवस म्हणून साजरा केला गेला.

१. वरीलपैकी एकही नाही

**३७.खालील विधाने विचारात घ्या :**

अ. मानवी सांगाड्यात पाच प्रकारची हाडे असतात.

ब. वजनाला आधार देणे आणि हालचाली सुलभ करणे ही लांब हाडांची (डेपस लेपशी) कार्ये आहेत.

क, स्नायुबंधांना दबावापासून वाचविणे हे सपाट हाडांचे (त्रश्नरीं लेपशी) कार्य आहे.

पर्यायी उत्तरे :

१. विधाने अ, ब बरोबर २. विधाने ब, क बरोबर

३. विधाने अ, क बरोबर ४. सर्व विधाने बरोबर

३८.परमाणू पुरवठादार गटा (NSG) बाबत खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही ?

१. सुरुवातीला परमाणू पुरवठादार गटात सात सरकारे सहभागी होती.

२. २०१८ पर्यंत परमाणू पुरवठादार गटात ५१ सरकारे सहभागी होती.

३. २०१८-१९ साठी परमाणू पुरवठादार गटाच्या अध्यक्षपदी लाटव्हिया आहे.

४. अणू तंत्रज्ञान निर्यातदार बनण्यासाठी भारत हा परमाणू पुरवठादार गटात सामिल होवू ईच्छितो.

## वरील प्रश्नांची उत्तरे

**उत्तरे-** (१) ४ (२) ३ (३) ३ ४) २ (५) १ (६) ३ (७) ४ (८) ३ (९) १ (१०) २ (११) ३ (१२) १ (१३) २ (१४) ३ (१५) ३ (१६) १ (१७) १ (१८) २ (१९) १ (२०) ४ (२१) ३ (२२) ४ (२३) ३ (२४) ३ (२५) १ (२६) १ (२७) १ (२८) ३ (२९) ४ (३०) १ (३१) २ (३२)२ (३३) २ (३४) ४ (३५) ३ (३६) ३ (३७) १ (३८) २

# पोलिस भरती येऊन गेलेले सराव पेपर

**प्र.१–भारतीय नौदलाच्या कमांडोना....असे नाव आहे.**
(१)कोब्रा (२)ब्लॅक कॅट (३)मार्कोस (४)ग्रे हाऊंड

**प्र.२–रेल्वे सुरक्षा अल कोणाच्या नियंत्रणात काम करते?**
(१)राज्य शाासन(२)गृह मंत्रालय (३)रेल्वे मंत्रालय(४)यापैकी नाही

**प्र.३–महाराष्ट्राच्या दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख....?**
(१)श्री प्रवीण दिक्षित (२)जयजीत सिंग
(३)श्रीमती मीरा बोरवणकर (४)देवेन भारती

**प्र.४–मे २०१५ मध्ये केंद्रीय निमलष्करी बल चे प्रमुख म्हणून कोणत्या भा.पो.से अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली?**
(१)सुरेंद्र कुमार (२)सुरेंद्र सिंग (३)सत्यपाल (४)प्रभु सिंग

**प्र.५–पुढे दिलेल्या कोणत्या राज्यात भारतीय लष्कराकडून 'ऑरेशन गुडविल' ही सदिच्छादर्शक मोहिम राबविली गेली होती?**
(१)आसाम (२)बिहार (३)मिझोराम (४)जम्मु–काश्मिर

**प्र.६–नक्षलवादाच्या सर्वात कमी प्रभाव असणारा महाराष्ट्रातील जिल्हा कोणता?**
(१)गडचिरोली (२)चंद्रपुर (३)गोंदिया (४)नाशिक

**प्र.७–CCTNS कशासंबंधी प्रणाली आहे?**
(१)बातम्या (२)क्रीडा (३)तांत्रिक (४)गुन्हे व गुन्हेगार

**प्र.८–भारतात प्रथमच आत्मसमर्पित नक्षलवाद्यांची नवजीवन नगर वसाहत कोठे उभारली जात आहे?**
(१)नागपूर (२)गडचिरोली (३)गोंदिया (४)चंद्रपूर

**प्र.९–'पोलीस प्रश्नांवर तरुणांची संवाद–युथ पार्लमेंट' ही संकल्पना कोणत्या पोलीस अधिकाऱ्याची आहे?**
(१)दत्तात्रय शिंदे (२)विश्ववास नांगरे पाटील
(३)महादेव तांबडे (४)रविंद्र सेनगावकर

**प्र.१०–'पाोलीस आणि कायदा व सुव्यवस्था' हे विषय घटनेच्या परिशिष्ट सातमधील.....मध्ये नमूद केले आहे?**
(१)राज्यसुची (२)केंद्रसूची (३)समवर्ती सूची (४)यापैकी नाही

**प्र.११–डॉ.पोळ आरोपी असलेली सिरीयल मर्डर केस कोणत्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडलेली आहे?**
(१)वाई (२)कोरेगाव (३) फलटण (४)म्हसवड

**प्र.१२–हिंगोली जिल्ह्यामध्ये किती पोलीस स्टेशन आ–हेत?**
(१)१५ (२)१७ (३)१२ (४)१३

**प्र.१३–याकुब मेमन या बॉम्ब स्फोटातील आरोपीस कोठे फाशी दिली गेली?**
(१)आर्थर रोड जेल (२)येरवडाजेल
(३)नागपूर जेल (४)तिहार जेल

**प्र.१४–कोणते पोलीस अधिकारी यांना वर्ष २०१५'लोकमत महाराष्ट्रीयन ऑफ दी ईयर' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले?**
(१)मनोज शर्मा (२)रोजेश प्रधान
(३)रविंद्र कदम (४)संदीप पाटील

**प्र.१५–नुकतेच संसदेने बाल गुन्हेगाराचे वय बाल न्याय विधेयक नुसारर.....इतके केले आहे?**
(१)१५ वर्ष (२)१६ वर्ष (३)१७ वर्ष (४)१८ वर्ष

**प्र.१६–नक्षलवादाचा गैरप्रभाव भारताच्या कोणत्या राज्यात नाही?**
(१)महाराष्ट्र (२)छत्तीसगड (३)झारखंड (४)उत्तराखंड

**प्र.१७–आंतरराराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालय कोठे आहे?**
(१)हेक (२)न्यूयॉर्क (३)टोकियो (४)नवी दिल्ली

**प्र.१८–नक्षलवाद्यांच्या मुळ छोट्या गटास काय म्हण–तात?**
(१)दलम (२)प्लाटुन (३)टिम (४)स्वाध्याय

**प्र.१९–निक्षलवाद्यांनी नुकत्याच पोलीस केंद्रावर कोठल्या ठिकाणी ॲम्बुश/हल्ला केला?**
(१)टिपागड (२)जाराबंडी (३)लालगड (४)दांतेवाडा

**प्र.२०–अतिरेक्यांशी लढा देण्यासाठी २६/११ नंतर महाराष्ट्र राज्यात कोणत्या विशेष दलाची स्थापना करण्यात आली?**
(१)एन.एस.जी (२)फोर्स वन (३)ग्रे हाऊंड (४)मार्कोस

**प्र.२१–गडचिरोली पोलीस दल व भुमकाल संघटनेव्दारा, लोक सहभागातुन....नाल्यावर पुल इ.स.२०१६ मध्ये बांधण्यात आला.**
(१)किष्टपुर (२)ताडगुडा (३)येरमनार (४)जुवी

**प्र.२२–गडचिरोलीमध्ये हे पोलीस मदत केंद्र २०१७ मध्ये कार्यान्वित झाले.**
(१)पातागुहाम (२)कटेझरी (३)कौटमी (४)खेलकचिल

**प्र.२३–नक्षलबारी घटनेला यावर्षी....वर्ष पूर्ण होत आ–हेत.**
(१)२५ (२)३० (३)५० (४)६०

**प्र.२४–महीराष्ट्रात (भारतीय रिझर्व्ह बटालियन)क्रमांक १४ कोठे आहे?**
(१)गोंदिया (२)धुळे (३)कोल्हापुर (४)औरंगाबाद

**प्र.२५–'ग्र हाऊंडस' हे नक्षलवाद विरोधी पोलीस दल कोणत्या राज्याने उभारले आहे?**
(१)कर्नाटक,गोवा (२)महाराष्ट्र,मध्ये प्रदेश
(३)आध्र प्रदेश (४)झारखंड,पश्चिम बंगाल

**प्र.२६–इस्त्राईलच्या गुप्तहेर संस्थेचे नाव काय आहे?**
(१)एमआयए (२)सिआयए (३)मोसाद (४)रॉ

**प्र.२७–मुंबईचे पोलीस आायुक्त जावेद अहमद यांची कोणत्या देशात भारताचे राजदूत म्हणून नियक्ती करण्यात आली?**
(१)मलेशिया (२)सिंगापूर (३)रशिया (४)सौदी अरेबिर्यो

**प्र.२८–सदोष मनुष्याचे भारतीय दंडविधान संहिता मधील योग्य कलम कोणते?**
(१)३०४ अ (२)३०४ (३)३०६ (४)३०१

**प्र.२९–पुणे पोलीसांच्या बडी कॉप हा उपक्रम कोणाकरिता राबविला जात आहे?**
(१)ज्येष्ठ नागरिक (२)नोकरपेशा महिला
(३)बाल गुन्हेगार (४)शालेय विद्यार्थी

**प्र.३०–माहिती अधिकार कायदा कधी अस्तित्वात आला?**
(१)२००५ (२)२००६ (३)२००७ (४)२००४

**प्र.३१–१९८८ कायदा लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील व्याख्येप्रमाणे लाच म्हणजे काय?**
(१)पैसे घेणे (२)मौल्यवान वस्तू घेणे
(३)सदर कायद्यात ती व्याख्या नाही (४)अ व ब दोन्ही

**प्र.३२–अ या लोकसेवकाने ब या व्यक्तीकडून शासकीय काम करण्यासाठी मौल्यवान वस्तुंची मागणी केली त्याने लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याच्या कोणत्या कलमान्वये गुन्हा केला?**
(१)६ (२)७ (३)८ (४)९

**प्र.३३–माहिती अधिकार कायदा २००५अन्वये एखाद्याच्या जिवितास करणीभूत असणारी माहिती किती कालावधीमध्ये देणे बंधनकारक आहे?**
(१)४८तास (२)२४तास (३)५दिवस (४)३दिवस

**प्र.३४–गुन्हेगारांचे डीएनए आधारित माहितीचे संकलन करून त्यांचे प्रो आईल तयार करणारे खालीलपैकी कोणते राज्य देशातील पहिले राज्य ठरले?**
(१)केरळ (२)आंध्र प्रदेश (३)महाराष्ट्र (४)गुजरात

**प्र.३५–प्रशासनात अधिक पारदर्शकता आणणे तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या उद्देशाने भारतात......या वर्षीपासुन माहितीचा अधिकार देण्यात आला आहे?**
(१)२००१ (२)२००२ (३)२००४ (४)२००५

**प्र.३६–भारताच्या पहिल्या स्वदेशी लढाऊ विमानाचे नाव काय आहे?**
(१)चेतक (२)पृथ्वी (३)तेजस (४)ब्राम्होस

**प्र.३७–पोलीस पाटील म्हणून नेमणूक होण्यासाठी उमेदवार किमान.....उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.**
(१)दहावी (२)बारावी (३)आठवी (४)अकरावी

**प्र.३८–भारतामध्ये गृहखात्याची निर्मिती केव्हा करण्यात आली?**
(१)१८५० (२)१८५८ (३)१८९५ (४)१८४३

**प्र.३९–जून २०१५ मध्ये हवाई हल्ल्यापासून संरक्षण करणारी खालीलपैकी कोणती यंत्रणा भारतीय लष्कराकडे सुपुर्द करण्यात आली?**
(१)आकाश (२)नाग (३)ब्राम्होस (४)अर्जुन

**प्र.४०–बाल्कन प्रदेश हा.....देशाच्या साम्राज्यात मोडणारा प्रदेश होता?**
(१)फ्रान्स (२)जपान (३)तुर्कस्तान (४)इटली

**प्र.४१–उगवत्या सूर्याचा देश म्हणून कोणत्या संबांधले जाते?**
(१)चीन (२)म्यानमार (३)जपान (४)द.कोरिया

**प्र.४२–जगात सर्वात जास्त लोकसंख्या असलेलस देश कोणता?**
(१)भारत (२)अमेरिका (३)ब्राझील (४)चीन

**प्र.४३–हिऱ्याच्या खाणी कोणत्या खंडात विपुल प्रमाणात आहे?**
(१)आफ्रीका (२)अंटार्टिका (३)अमेरिका (४)आशिया

**प्र.४४–जगातील सर्वात मोठा खंड कोणता?**
(१)आफ्रीका (२)अंटार्टिका (३)अमेरिका (४)आशिया

**प्र.४५–खालीलपैकी कोणता देश भारताचा शेजारी नाही?**
(१)चीन (२)पाककिस्तान (३)नेपाळ (४)फ्रान्स

**प्र.४६–जगातील सर्वात लांब नदी कोणती आहे?**
(१)ॲमेझॉन (२)नाईल (३)मिसिसीपी (४)सिंधू

**प्र.४७–जगाची विभागणी एकूण किती खंडात झाली आहे?**
(१)३ (२)५ (३)४ (४)७

**प्र.४८–.....ची सामुद्रधुनी अंदमान समुद्र व जावा समुद्र यांना जोडते?**
(१)पाल्क (२)मलाक्का (३)बेरींग (४)जिब्राल्टर

**प्र.४९–उष्ण व थंड सागरी प्रवाह एकत्र येतात त्या ठिकाणी....निर्माण होते.**
(१)बर्फ (२)दाट धुके (३)कमी तापमान (४)वारा

**प्र.५०–'मरियाना गर्ता' ही जगातील सर्वात खोल गर्ता....महासागरात आहे?**
(१)अटलांटिक (२)आर्क्टिक (३)पॅसिफिक (४)यापैकी नाही

**प्र.५१–सात बेटांचे शहर हे कोणत्या शहराला म्हणतात?**
(१)चेन्नई (२)मुंबई (३)कोलकत्ता (४)दिल्ली

**प्र.५२–जगातील लोकसंख्येत भारताचा कितवा क्रमांक आहे?**
(१)प्रथम (२)व्दितीय (३)तृतीय (४)चतुर्थ

**प्र.५३–साखरेचे कोठार कोणत्या देशाला म्हणतात ?**
(१)स्पेन (२)जापान (३)भुतान (४)क्युबा

**प्र.५४–खालीलपैकी कोणता देश सार्कचा सदस्य नाही ?**
(१)नेपाळ (२)भूतान (३)जापान (४)अफगाणिस्तान

**प्र.५५–.....हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण आहे?**
(१)नागपूर (२)भोपाळ (३)अमरावती (४)औरंगाबाद

**प्र.५६–भारतातील सर्वात मोठा जिल्हा कोणता?**
(१)अहमदनगर (२)कोलकाता (३)कच्छ (४)मुंबई

**प्र.५७–खालीलपैकी कोणत्या राज्याची सीमा पाकिस्तानच्या सीमेला लागून नाही?**
(१)पंजाब (२)राजस्थान (३)गुजरात (४)हरियाणा

**प्र.५८–राष्ट्रीय पोलीस अकॅडमी कोणत्या ठिकाणी आहे?**
(१)मसुरी (२)हैद्राबाद (३)नाशिक (४)डेहराडून

**प्र.५९–भारताचा सुमारे–––% भाग शेती लागवडीखाली आहे.**
(१)४०% (२)५०% (३)६०% (४)७०५

**प्र.६०–क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारत हा जगातील.....क्रमांकाचा मोठा देश आहे?**
(१)पाचव्या (२)सहाव्या (३)चौथ्या (४)सातव्या

**प्र.६१–खालीलपैकी कोणते राज्य भारताच्या पूर्व किनाऱ्यावर वसलेले नाही?**
(१)केरळ (२)तामिळनाडू (३)आंध्र प्रदेश (४)ओरिसा

**प्र.६२–क्षेत्रफळाच्या दृष्टीने.....हे देशातील सर्वात मोठे राज्य आहे.**
(१)उत्तरप्रदेश (२)राजस्थान (३)मध्यप्रदेश (४)महाराष्ट्र

**प्र.६३–सरदार सरोवर प्रकल्प कोणत्या नदीवर आहे?**
(१)गंगा (२)गोदावरी (३)महानदी (४)नर्मदा

**प्र.६४– हैद्राबाद या शहरात खालीलपैकी कोणती संस्था आहे?**
(१)४८सकेंद (२)२०सकेंद (३)५६सकेंद (४)५२सकेंद

**प्र.६५–जन–गण–मन या भारतीय राष्ट्रगीत बायनाचा प्रमाणित कालावधी......सेंकद आहे?**
(१)४८सकेंद (२)२०सकेंद (३)५६सकेंद (४)५२सकेंद

**प्र.६६–सी.बी.आय.चे सध्याचे संचालक खालीलपैकी कोण आहेत?**
(१)एम.नागेश्वरराव (२)सुबोधकुमार जैस्वाल
(३)श्री.अनिल कुमार (४)श्री.अलोक जोशी

**प्र.६७–सध्याचे भारतीय नौदल संचालक खालीलपैकी काकेण आहेत?**
(१)श्री.आर.के.धवन (२)श्री.डि.के.जोशी
(३)श्री.व्ही.के.सिंग (४)करमवीर सिंग

**प्र.६८–महाराष्ट्रात वाहतूक पोलीस कोणत्या रंगाचा शर्ट घालतात?**
(१)पांढरा (२)खाकी (३)निळा (४)लाल

**प्र.६९–ट्रॅफीक पोलीस अतिवेग जाणाऱ्या वाहनांचा वेग माजण्यासाठी कोणत्या संत्राचा वापर करतात?**
(१)स्पीड मीटर (२)स्पीड ऑनालायझर
(३)स्पीड ॲपरेटर (४)स्पीड गन

**प्र.७०–आंतरराष्ट्रीय पोलीस संघटना कोणत्या नावाने ओळखली जाते?**
(१)Interpol (२)Internet (३)Unicef (४) Unipol

**प्र.७१–महिला पोलीसांची नेमणूक देशात सर्वप्रथम कोणत्या राज्यात केली गेली?**
(१)गोवा (२)महाराष्ट्र (३)गुजरात (४)केरळ

**प्र.७२–नुकतेच ग्र–हाऊस या कमांडोदलाचे जवान मलकामगिरी कोणत्या ठिकाणी नक्षलवादी हल्ल्यात शहिद झाले होते?**
(१)छत्तीसगड (२)ओरिसा (३)झाररखंड (४)आंध्र प्रदेश

**प्र.७३–फिल्ड मार्शल माणेकशाँ हे खालीलपैकी कशाशी संबंधित होते?**
(१)शास्त्रज्ञ (२)राजकाररनी (३)लष्करी अधिकारी (४)गायक

**प्र.७४–अलिकडे जर्मन बेकरी कशामुळे चर्चेत आली आहे?**
(१)आंतरराष्ट्रीय दर्जाचे केक उत्पादन
(२)पोलीस चकमक (३)दहशतवादी हल्ला
(४)अग्नीकांड

**प्र.७५–२६/११ च्या मुबईवरील अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्या सैन्य दलातील अधिकारी कोण?**
(१)आय.जी.पी.श्री.हेमंद करकरे
(२)डी.आय.जी.पी.श्री.अशोक कामटे
(३)मेजर श्री.उन्नीकृष्णन
(४)पी.ओयोश्रीरानिमखनी पृष्ठमाकर

**प्र.७६–ओसामा बिन लादेनला नेस्तनाबूत केलेल्या ऑपरेशनचे नाव काय?**
(१)नेप्च्युन स्पीअर (२)डेड एंड
(३)डेझर स्टॉर्स (४)स्माइलिंग बुध्दा

**प्र.७७–भारतीय नौसेनेत नुकत्याच सामील केलेल्या विमानवाहक नौकेचे नाव काय ?**
(१)विक्रमादित्य (२)शिवाजी (३)राणाप्रताप (४)चंद्रगुप्त

**प्र.७८–खालीलपैकी कोणत्या ठिकाणी पोलीस स्टेशन नाही?**
(१)बामणी (२)पिंपळदरी (३)राणीसावरगाव (४)दैठण

**प्र.७९–आय.पी.सी.म्हणजे काय?**
(१)भारतीय दंड संहिता (२)फौजदारी प्रक्रिया संहिता
(३)भारतीय पुरावा कायदा (४)यापैकी नाही

**प्र.८०–एखादा सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी लाच घेताना पकडला गेल्यास त्यावर पोलिसांचा कोणता विभाग मुख्यतः तपास करतो?**
(१)सी.आय.डी. (२)एस.आय.डी. (३)एल.सी.बी. (४) ए.टी.एम.

**प्र.८१–महाराष्ट्राचे दहशतवादी दलाचे मुख्यालय खालीलपैकी संक्षिप्त नावव काय?**
(१)ए.टी.एस. (२)ए..टी.सी (३)ए.बी.पी. (४)ए.टी.एम.

**प्र.८२–राज्य राखीव पोलीस दलाचे मुख्यालय खालीलपैकी कोणतरूा ठिकाणी आहे?**
(१)पुणे (२)नागपूर (३)वसई (४)नारेगाव

**प्र.८३–दहशतवादी कारवायांवर प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र पोलीसांचा कोणता विभाग सक्रीय असतो?**
(१)जिल्हा पोलीस दल (२)गुन्हे विभाग
(३)ॲन्टी टेररिस्ट स्कॉड (४)बॉम्बशोधक व नाशक पथक

**प्र.८४–जी.आर.पी. म्हणजे काय?**
(१)गोवा रिपल्बीक पार्टी (२)गर्व्हमेंट रेल्वे पोलीस
(३)ग्रेटर मुबई रेल्वे पोलीस (४)गर्व्हनर रेल्वे पोलीस

**प्र.८५–रेल्वे पोलीस म्हणजेच....?**
(१)आर.पी.एफ (२)जी.आर.पी.
(३)एस.आर.पी (४)ए.टी.एस.

**प्र.८६–महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधीनी......येथे आहे.**
(१)पुणे (२)मुंबई (३)ठाणे (४)नाशिक

**प्र.८७–२६ नोव्हेंबर २००८ साली मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याची चौकशी करणारी समिती कोणती ?**
(१)प्रधान समिती (२)पटेल समिती
(३)बसाक समिती (४)मेनन समिती

**प्र.८८–सोलार कुकरची आतील बाजूस ......... रंगानी रंगवलेली असते.**
(१)लाल (२)पिवळा (३)पांढरा (४)काळा

**प्र.८९–२०१४ चे अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन कोठे झाले?**
(१)पुणे (२)सासवड (३)ठाणे (४)नाशिक

**प्र.९०–संत तुकाराम यांचे जन्म भूमी कोणती आहेत?**
(१)पैठण (२)आळंदी (३)देह (४)पंढरपूर

**प्र.९१–इंटरनेट ॲनलॉग व डिजीटर सिग्रलचे एकमंकांमध्ये रूपांतर करून संगणक प्रणालीमण्ये माहितीची देवाण–घेवाण करण्यासाठी कोणते उपकरण वापरतात?**
(१)मोडेम (२)वेबकॅम (३)इंटरकॉम (४)पेन ड्राईव्ह

**प्र.९२–सत्यशोधक समाजाची स्थापना कोणी केली?**
(१)आत्माराम पांडूरंग (२)गोपाल हरी देशमुख
(३)म.गो.रानडे (४)ज्योतिबा फुले

**प्र.९३–ठाणे जिल्ह्यात किती लोकसभा मतदार संघ आ–हेत?**
(१)३ (२)४ (३)५ (४)२

**प्र.९४–तारापूर अणुऊर्जा प्रकल्प कोणत्या तालुक्यात आहे?**
(१)कल्याण (२)भिवंडी (३)पालघर (४)शहापूर

**प्र.९५–ठाणे जिल्ह्यातील मलंगगड हा किल्ला कोणी बांधला?**
(१)छत्रपती शिवाजी महाराज (२)छत्रपती संभाजी महाराज
(३)शिलाहार राजा (४)रामदेवराय यादव

**प्र.९६–सिक्किम या राज्याची राजधानी कोणती ?**
(१)कोहिमा (२)अगरतळा (३)गंगटोक (४)गौहाटी

**प्र.९७–खालीलपैकी शुध्द शब्द ओळखा?**
(१)अधपतन (२)अधोपतन (३)अधःपतन (४)अधीपतन

**प्र.९८–भारताचे पितामह कोणास म्हणतात?**
(१)लोकमान्य टिळक (२)महात्मा गांधी
(३)दादाभाई नौरोजी (४)न्यायमूर्ती रानडे

**प्र.९९–बिस्मीला खान : सनई :: रविशंकर : ?**
(१)नृत्य (२)बासरी (३)सतार (४)तबला

**प्र.१००–ताडोबा राष्ट्रीय उद्यान कोणत्या जिल्ह्यामध्ये आहे?**
(१)गडचिरोली (२)गोंदिया (३)चंद्रपूर (४)नागपूर

## वरील प्रश्नांची उत्तरे

**उत्तरे-** (१) ३ (२) ३ (३) २ (४) ४ (५) ४ (६) ४ (७) ४ (८) २ (९) २ (१०) १ (११) १ (१२) ४ (१३) ३ (१४) ४ (१५) २ (१६) ४ (१७) १ (१८) १ (१९) ४ (२०) २ (२१) ४ (२२) ४ (२३) ३ (२४) ४ (२५) ३ (२६) ३ (२७) ४ (२८) ४ (२९) २ (३०) १ (३१) ३ (३२) २ (३३) १ (३४) २ (३५) ४ (३६) २ (३७) १ (३८) ४ (३९) १ (४०) ३ (४१) ३ (४२) ४ (४३) १ (४४) ४ (४५) ४ (४६) २ (४७) ४ (४८) २ (४९) २ (५०) ३ (५१) २ (५२) २ (५३) ४ (५४) ३ (५५) १ (५६) ३ (५७) ४ (५८) ४ (५९) ३ (६०) ४ (६१) १ (६२) २ (६४) १ (६५) ४ (६६) २ (६७) ४ (६८) १ (६९) ४ (७०) १ (७१) ३ (७२) १ (७३) ३ (७४) ३ (७५) ३ (७६) १ (७७) १ (७८) ३ (७९) १ (८०) ४ (८१) १ (८२) ४ (८३) ३ (८४) २ (८५) १ (८६) १ (८७) १ (८८) ४ (८९) २ (९०) ३ (९१) १ (९२) ४ (९३) २ (९४) ३ (९५) २ (९६) ३ (९७) ३ (९८) ३ (९९) ३ (१००) ३

## तब्बल एक महिना चालणार बारावी बोर्ड परीक्षा

**असे असेल परीक्षेचे वेळापत्रक**

बारावी बोर्ड परीक्षेचे वेळापत्रक जाहीर, २१ फेब्रुवारी रोजी सुरु होणार परीक्षा: मित्रांनो महाराष्ट्र बोर्डाच्या १२ वि (बारावी) परीक्षेचे वेळापत्रक नुकतेच जाहीर झाले असून हि परीक्षा तब्बल एक महिना चालणार आहे. होय विध्यार्थी मित्रांनो , वेगवेगळ्या विषयानुसार परीक्षेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे असेल.

यावर्षी महाराष्ट्र बोर्ड परीक्षा २१ फेब्रुवारी २०२३ ते २० मार्च २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आली असून , ही परीक्षा दोन शिफ्टमध्ये घेण्यात येणार असून, पहिली शिफ्ट दुपारी ११ ते २ आणि दुसरी शिफ्ट ३ झच् ते ६ झच.

महाराष्ट्र बोर्ड १२वी वेळापत्रक २०२३

मंडळाचे नाव : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

परीक्षा : महाराष्ट्र उच्च माध्यमिक परीक्षा

वर्ष : २०२३

परीक्षा सुरू होण्याची तारीख : २१ फेब्रुवारी २०२३

परीक्षेची शेवटची तारीख : २० मार्च २०२३

आम्ही तुम्हाला सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्र बोर्डाने बारावीचे वेळापत्रक २०२३ जाहीर केले आहे, ज्याच्या नियोजित तारखा आम्ही खाली दिलेल्या तक्त्याद्वारे दाखवल्या आहेत, विद्यार्थी दिलेले वेळापत्रक वाचू शकतात आणि परीक्षेच्या तारखांची माहिती येथे मिळवू शकतात.

## संक्षिप्त-....

नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी नवीन अभ्यासक्रम!

### युवकांना मिळणार प्रशिक्षण आणि रोजगार



नाशिक येथे होणाऱ्या २०२६-२७ च्या कुंभमेळ्यासाठी भाविकांच्या सेवेकरिता 'वैदिक संस्कार ज्युनियर असिस्टंट' हा विशेष अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

आगामी २०२६-२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सेवेसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी वैदिक संस्कार ज्युनियर असिस्टंट हा विशेष अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे धार्मिक मेळे, यात्रा आणि तीर्थक्षेत्रांमध्ये सेवा देणाऱ्या युवकांना व्यावसायिक प्रशिक्षण मिळणार असून, कुंभमेळ्यात भाविकांचे स्वागत, मार्गदर्शन आणि व्यवस्थापनासाठी हजारो प्रशिक्षित युवक कार्यरत राहतील, अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) तर्फे राबविण्यात येणारा हा अल्पमुदतीचा अभ्यासक्रम राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखड्याच्या (National Skill Qualification Framework - NSQF) मान्यतेने सुरू करण्यात आला आहे. या प्रशिक्षणात युवकांना धार्मिक वातावरणातील आचारसंहिता, भाविकांशी संवाद, आरोग्य आणि स्वच्छतेबाबत जनजागृती, तसेच सामाजिक समन्वय अशा विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.मंत्री लोढा म्हणाले, नाशिक कुंभमेळा ही केवळ धार्मिक घटना नसून, ती एक सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळ आहे. लाखो भाविकांच्या उपस्थितीत सर्व व्यवस्था सुरळीत पार पडावी, यासाठी प्रशिक्षित आणि संस्कारित युवकांची मोठी गरज आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून ती गरज पूर्ण होईल. या उपक्रमाच्या माध्यमातून केवळ कुंभमेळ्यापुरतेच नव्हे, तर इतर तीर्थक्षेत्रांमध्येही प्रशिक्षित युवक सेवा देतील. त्यांना धार्मिक पर्यटन, कार्यक्रम व्यवस्थापन आणि सामाजिक संवाद या क्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधीही उपलब्ध होतील. विशेष म्हणजे हा अभ्यासक्रम महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता देशातील इतर राज्यांमध्येही राबविण्याची योजना आहे, अशी माहिती कौशल्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

या अभिनव उपक्रमामुळे पारंपरिक वैदिक संस्कार आणि आधुनिक व्यवस्थापन कौशल्य यांचा संगम साधला जाणार असून, या प्रशिक्षणातून तयार होणारे युवक भाविकांच्या सेवेत शिस्त, समर्पण आणि संस्कार यांचे उत्तम उदाहरण ठरतील. त्यामुळे आगामी नाशिक कुंभमेळा अधिक सुयोजित आणि संस्मरणीय ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

'महाज्योती' आणेल 'महाबद्दल'!

# OBC समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण रोजगाराची उत्तम संधी

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी**/महाराष्ट्र सरकारच्या नियंत्रणाखाली महाज्योती नावाची योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा सगळ्यात मोठा फायदा हा ओबीक समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक तसेच नोकरीदृष्ट्या होणार आहे.

नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) च्या प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात पार पडले. या प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांनी ओबीसी समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी राज्य सरकारने राबविलेल्या उपक्रमांची माहिती दिली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ओबीसी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रात ओबीसी मंत्रालयाची स्थापना करण्यात आली आहे. या मंत्रालयाच्या माध्यमातून समाजाच्या प्रगतीसाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे काम सुरू आहे. याच उद्देशाने स्थापन झालेली महाज्योती संस्था ओबीसी विद्यार्थ्यांना शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करण्याचे काम करत आहे.

ओबीसी विद्यार्थ्यांसाठी राज्यात ६० हून अधिक वसतिगृहे सुरू करण्यात आली असून, स्वावलंबनासाठी १५ लाखांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच पीएचडी अभ्यासक्रम आणि स्पर्धा परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षण केंद्रे सुरू केल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना यश मिळाले आहे. या सर्व योजनांमुळे ओबीसी समाजातील नव्या पिढीला शिक्षणाच्या माध्यमातून प्रगतीची नवी दिशा मिळत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. ते पुढे म्हणाले की, ओबीसींसह अनुसूचित जाती आणि जमातींच्या विकासाची जबाबदारी राज्य सरकारची आहे. यासाठी मोदी आवास घरकुल योजना सुरू करण्यात आली आहे, ज्यामुळे अनेक कुटुंबांना स्वतःचे घर मिळू शकले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी विश्वास व्यक्त केला की, महाज्योतीची नव्याने उभी राहणारी अत्याधुनिक प्रशासकीय इमारत ओबीसी समाजासाठी एक भक्कम आधार ठरेल. या केंद्रातून ओबीसी विद्यार्थ्यांना शिक्षण, मार्गदर्शन आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. त्यांच्या स्वप्नांना नवे बळ मिळून ते आत्मविश्वासाने गगनभरारी घेतील.या कार्यक्रमास मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार डॉ. परिणय फुके तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत पार पडलेले भूमिपूजन समारंभ ओबीसी समाजाच्या नव्या युगाची सुरुवात ठरला.

## 'बालभारती'च्या

नव्या पान ४ वरून..

असून त्यामुळे पाने सहज फाटण्याची शक्यता आहे. मुद्रण प्रक्रियेसाठी महत्त्वाचे असलेले स्मूदनेस आणि वॅक्स पिक निकषही खाली आणले आहेत. त्यामुळे शाई पसरून अक्षरे धूसर होणे, पुस्तकांचा अपव्यय वाढणे अशी परिस्थिती येऊ शकते.

निविदेतील पात्रतेचे निकषही शिथिल करण्यात आले आहेत. पूर्वी पुरवठादारांनी सलग तीन वर्षांत निविदेच्या किमान ५० टक्के पुरवठा केल्याचे दाखवणे बंधनकारक होते.

आता मात्र एका वर्षातील पुरवठ्याची नोंद पुरेशी आहे. त्यामुळे अल्पअनुभवी कंपन्यांनाही मोठ्या प्रमाणावर पुरवठ्याची संधी मिळणार आहे. याबाबत शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या 'संकल्प जीवन चॅरिटेबल ट्रस्ट' ने न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे.

या निविदेमुळे पाठ्यपुस्तकांचा दर्जा खालावून विद्यार्थ्यांचे नुकसान होईल, असा दावा संस्थेचे संस्थापक प्रवीण जाधव यांनी केला आहे.

**'दर्जात तडजोड नाही'**

-'बालभारती'च्या प्रभारी संचालक अनुराधा ओक यांना याबाबत विचारले असता, 'दर्जाबाबत तडजोड करण्यात आलेली नाही. कागदासाठीची मागणी निकषांनुसारच आहे,' असे त्यांनी सांगितले. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचे निविदेतील निकष दुय्यम दर्जाचे असल्याबाबत विचारले असता त्यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.

## जेईई मुख्य परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी आधार आणि प्रमाणपत्र नाव जुळण्याचे पर्याय उपलब्ध

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी**/ जेईई मेन परीक्षेचा अर्ज भरताना आधारकार्ड व दहावीचे प्रमाणपत्र यावरील नाव जुळत नसल्यास विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरताना पर्याय दिला जाणार असल्याचे नॅशनल टेस्टिंग एजन्सीमार्फत (एनटीए) जाहीर करण्यात आले आहे. देशातील लाखो विद्यार्थ्यांना यामुळे दिलासा मिळाला असून, याबाबत अधिक माहितीसाठी ६ नोव्हेंबर २०२४ ला जाहीर केलेले सूचनापत्र पाहण्याची सूचना 'एनटीए' मार्फत करण्यात आली आहे.



काही दिवसांपूर्वी जेईई मेनचा अर्ज 'एनटीए' मार्फत सूचनापत्र जाहीर करण्यात आले होते. हा अर्ज भरताना आधारकार्ड जोडणे आवश्यक असल्याचे व त्यावरील नाव दहावीच्या प्रमाणपत्रावरील नावाशी भरण्याबाबत जुळत असणे गरजेचे असल्याचे 'एनटीए' मार्फत जाहीर करण्यात आले होते. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांसह पालकही मोठ्या चिंतेत होते.

एसएससी बोर्ड, सीबीएसई, आयसीएसई तसेच आयजीसीएसई या सर्वच मंडळांची दहावीच्या उत्तीर्णता प्रमाणपत्रावरील नाव लिहिण्याची पद्धत वेगवेगळी आहे.

काही मंडळांमार्फत विद्यार्थ्यांचे आडनाव आधी लिहिले जाते, तर काही मंडळांमध्ये विद्यार्थ्यांचे नाव व आडनाव याखाली त्याच्या पालकांची नावे लिहिली जातात. त्यामुळे आधार कार्डवरील नाव व दहावीच्या प्रमाणपत्रावरील नाव जुळण्यास अनेक अडचणी येत होत्या.

त्यामुळे लाखो विद्यार्थी व पालकांकडून हा निर्णय मागे घेण्याची मागणी होत होती. परंतु, डमी विद्यार्थी परीक्षेला बसू नयेत या काळाजीसाठी हा निर्णय घेतल्याचे 'एनटीए' मार्फत जाहीर करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना ऐन परीक्षेवेळी या निर्णयाचा आलेला ताण लक्षात घेत, हे नाव न जुळल्यास ऑनलाइन अर्ज भरताना ऐनवेळी त्यासाठी पर्याय उपलब्ध करून दिला जाणार आहे.

महत्त्वाच्या सूचना -

विद्यार्थ्यांना अर्ज भरताना येणाऱ्या अडचणी कमी करण्यासाठी नाव, जन्म तारीख, लिंग, फोटो आणि पत्ता हा तपशील थेट विद्यार्थ्याच्या अधार कार्डवरून घेतला जाणार आहे.

आई, वडील किंवा पालकांचे नाव विद्यार्थ्याला अर्ज भरताना स्वतः भरावे लागणार आहे.

'एनटीए' मार्फत दोन सत्रात जेईई मेन परीक्षा घेतली जाणार आहे.

पहिले सत्र २१ ते ३० जानेवारीदरम्यान होणार आहे.

दुसरे सत्र १ ते १० एप्रिलदरम्यान होणार आहे. यासाठी जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात अर्ज प्रक्रिया राबविली जाणार आहे.


# मेडिकल क्षेत्रात करिअर घडवायचे आहे?

मेडिकल क्षेत्र हे समाजसेवा आणि प्रतिष्ठेचं प्रतीक मानलं जातं. आजच्या काळात डॉक्टर, नर्स, फार्मासिस्ट, आणि संशोधक यांसारख्या व्यवसायांना मोठी मागणी आहे. मात्र या क्षेत्रात करिअर करण्यासाठी योग्य नियोजन, कठोर परिश्रम आणि सातत्याची गरज असते. चला, टप्प्याटप्प्याने समजून घेऊया की मेडिकलमध्ये करिअर कसं करावं. मेडिकल क्षेत्रात जाण्यासाठी सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे ११वी आणि १२वीत विज्ञान शाखा (Biology Group) निवडणे. म्हणजेच विद्यार्थ्यांनी Physics, Chemistry, Biology (PCB) हे विषय शिकलेले असणे आवश्यक आहे. या टप्प्यावरच विद्यार्थ्यांनी आपल्या संकल्पना स्पष्ट ठेवून अभ्यासात मजबूत पाया तयार करावा.

१२वी नंतर NEET (National Eligibility cum Entrance Test) ही परीक्षा देणं बंधनकारक आहे. ही परीक्षा भारतातील सर्व सरकारी आणि खासगी मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेशासाठी घेतली जाते. छएएढ मध्ये मुख्यतः फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायोलॉजी या विषयांवर आधारित प्रश्न असतात. छएएढ उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना MBBS (Bachelor of Medicine and Bachelor of Surgery) किंवा BDS (Bachelor of Dental Surgery) या अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळतो.

चइइड पाच अडीच वर्षांचा अभ्यासक्रम आहे. यामध्ये एक वर्षाची अनिवार्य इंटर्नशिप असते. MBBS पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी डॉक्टर म्हणून काम करू शकतात किंवा पुढे MD / MS (Post Graduation) करून स्पेशलायझेशन निवडू शकतात. दंतवैद्य (Dentist) बनण्यासाठी BDS हा मार्ग आहे. आयुर्वेद, होमिओपॅथी किंवा युनानी वैद्यक शास्त्रात रस असणाऱ्यांसाठी B-MS / BHMS / BUMS उत्तम पर्याय आहेत. B.Sc Nursing, Pharmacy, Physiotherapy, Medical Lab Technology हे देखील मेडिकल क्षेत्रातील लोकप्रिय अभ्यासक्रम आहेत.

MBBS किंवा इतर वैद्यकीय पदवी पूर्ण केल्यानंतर तुम्ही रुग्णालयात डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, शासकीय सेवा, संशोधन क्षेत्र, शिक्षण क्षेत्र किंवा स्वतःचा क्लिनिक सुरू करू शकता. परदेशातही भारतीय डॉक्टरांची मोठी मागणी आहे. मेडिकल क्षेत्रात करिअर करायचं म्हणजे केवळ नोकरी नव्हे, तर मानवतेची सेवा करण्याची संधी आहे. मेहनत, समर्पण आणि जबाबदारीची भावना असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे क्षेत्र यश, सन्मान आणि समाधान देणारं आहे.



# क्रीडा शिक्षकांच्या जागा लवकरच भरणार-क्रीडामंत्री माणिकराव कोकाट

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी**/खेलो इंडियात महाराष्ट्राचे दुसरे स्थान आहे. खेळाडू घडवणारे क्रीडा शिक्षक आज रोजंदारीवर काम करत आहेत. क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी क्रीडा शिक्षकांच्या जागा लवकरच भरण्याचे आश्वासन दिले. २५१ मुलांमागे एक क्रीडा शिक्षक भरला जाईल. दहा ते बारा वर्षांपासून अनुदानित शाळेत भरती झालेली नाही. अनेक पात्र खेळाडूंचे वय वाढत आहे. त्यांना खासगी शाळांमध्ये अल्प मानधनावर काम करावे लागत आहे.खेलो इंडियासारख्या स्पर्धांमध्ये महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर या असून, खेळाडूंच्या मागे क्रीडा शिक्षक सक्षमपणे उभा आहे. मात्र या क्रीडा शिक्षकाला आज दारोदारी भटकण्याची वेळ आली आहे. क्रीडा शिक्षक हा खेळाडू घडवण्यासाठी आपलं आयुष्य वेचत असताना आज खासगी शाळांमध्ये रोजंदारीवर काम करावे लागत आहे. क्रीडा शिक्षकांप्रती महाराष्ट्र सरकारला आदर असून, वित्त विभागाशी



चर्चा करून क्रीडा शिक्षकांच्या जागा लवकरच भरल्या जातील, असे आश्वासन क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिले.

क्रीडा शिक्षकांनी त्यांची एका कार्यक्रमात भेट घेतली असता, त्यांनी ही ग्वाही दिली. पुढे ते म्हणाले की, २५१ मुलांमागे एक क्रीडा शिक्षक भरला जाणार असून त्याला लवकरच मूर्त स्वरूप येईल. क्रीडा शिक्षकांनी त्यांची भेट घेऊन निवेदन दिले. यामध्ये म्हटले आहे की, गेल्या

दहा ते बारा वर्षांपासून शासनाने कुठल्याही अनुदानित शाळेमध्ये क्रीडा शिक्षक भरती केलेली नाही. अनेक चांगल्या खेळाडूंनी बीपीएड, एमपीएड केले असूनही आज शासनाच्या नाकर्तेपणामुळे या खेळाडूंचे वय वाढत जात आहे. त्यांना नाईलाजास्तव कुठल्यातरी खासगी शाळा, महाविद्यालयांत अल्प मानधनावर काम करावे लागत आहे.

अनेक राष्ट्रीय खेळाडू नेट-सेट पीएच.डी. झालेले आहेत. अनेक क्रीडा शिक्षकांना करोनाकाळात नामांकित शाळांनी कामावरून कमी केले. परिस्थितीशी सामना करीत काहींनी खासगी कंपनीत काम करीत चरितार्थ चालवला आहे.

दोन संस्थांमध्ये अत्यल्प मानधनावर प्रशिक्षक म्हणून राबतो आहे. अजूनही वेळ गेलेली नाही. २०१३ पासून सरकारने क्रीडा शिक्षकांची भरती केलेली नाही. आमच्यासारख्या प्रशिक्षकांना न्याय द्यावा.

**स्वप्नील कर्पे, सेट परीक्षा पास प्रशिक्षक**

महाविद्यालयात क्रीडा शिक्षक होऊ असे स्वप्न उराशी बाळगले होते, मात्र ते या जन्मात पूर्ण होईल की नाही ते सांगता येत नाही. आमचे जे हाल झाले ते पुढच्या पिढीचे होऊ नये यासाठी मी तर आमच्या मुलांना या क्षेत्रात येऊ नये असेच सांगेल.

संतोश लहाने, क्रीडा शिक्षक दोन हजार सोळाला डॉक्टरेट मिळवली. अनेक कॉलेजेसमध्ये मुलाखतीसाठी गेलो, परंतु त्या ठिकाणी अगोदरच जागा भरून ठेवलेल्या होत्या. लाखो रुपये मागण्यात आले. एव्हढे पैसे आणायचे कुठून? त्या पेक्षा एका खासगी संस्थेत काम करीत आहे.

**-डॉ. संदीप पाटील, क्रीडा शिक्षक**

# २०२६ च्या एमपीएससी परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीरा!

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/**एमपीएससीने २०२६ मध्ये होणाऱ्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. महाराष्ट्र वनसेवा, स्थापत्य अभियांत्रिकी सेवा, कृषी सेवा, गट–ब आणि गट–क सेवा परीक्षांचे निकाल ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये अपेक्षित आहेत. राज्यसेवा मुख्य परीक्षा ऑक्टोबरमध्ये होईल, तर निकाल २०२७ मध्ये जाहीर होईल.

शिक्षक भरतीसाठी सीटीईटी २०२६ ची अधिसूचना लवकरच प्रसिद्ध होईल.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (एमपीएससी) पुढील वर्षी (२०२६) घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. वेळापत्रकानुसार, ५ ते ९ मे रोजी महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा २०२५ होणार आहे. तर १६ मे रोजी स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२५, महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२५ होणार आहे.

या तिन्ही परीक्षांचा निकाल ऑगस्टमध्ये प्रसिद्ध होईल. १७ मे रोजी महाराष्ट्र अराजपत्रित गट–ब सेवा संयुक्त मुख्य परीक्षा २०२५ होणार आहे, तर महाराष्ट्र गट–क सेवा संयुक्त मुख्य परीक्षा ७ जून रोजी घेण्यात येईल. दोन्ही निकाल सप्टेंबरमध्ये जाहीर होणार आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा ३१ मे रोजी होऊन ऑगस्टमध्ये निकाल जाहीर केला जाणार आहे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षेचा तपशील स्वतंत्रपणे जाहीर केला जाणार आहे. तसेच ३ ऑक्टोबर ते २४




ऑक्टोबर या कालावधीत राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२६ घेतली जाणार आहे. या परीक्षेचा निकाल ऑगस्ट २०२७ मध्ये जाहीर केला जाणार आहे.

१५ नोव्हेंबर रोजी विद्युत अभियांत्रिकी आणि यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२६ होऊन फेब्रुवारी २०२७मध्ये निकाल प्रसिद्ध केला जाणार आहे. १५ नोव्हेंबर रोजीच महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२६, स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२६ आयोजित करून निकाल मार्च २०२७ मध्ये जाहीर केला जाणार आहे.

२१ नोव्हेंबर रोजी अन्न व औषध प्रशासन सेवा मुख्य परीक्षा २०२६, निरीक्षक वैधमापन शास्त्र मुख्य परीक्षा २०२६ आयोजित करण्यात येणार आहे, तर निकाल मार्च २०२७मध्ये जाहीर केला जाणार आहे.

२६ ते ३० डिसेंबर या कालावधीत महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा २०२६ आयोजित करून निकाल एप्रिल २०२७मध्ये जाहीर करण्यात येणार आहे, असे 'एमपीएससी'कडून सांगण्यात आले.

माहिती खात्रीची व प्रगतीची, देतो वेध भविष्याचा..
नौकरी एक्सप्रेस
नौकरी एक्सप्रेस घरपोच योजना
★ महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, संरक्षण सेवा, विविध बँका, रेल्वे, महामंडळे, सैन्य भरती, नौदल, हवाई दल, भुदल, कोस्ट गार्ड, होम गार्ड, महाराष्ट्र पोलिस भरती, रेल्वे पोलिस भरती, केंद्रीय पोलिस भरती, एनडीए, विविध शासकिय निमशासकीय यासह एमपीएससी/युपीएससी प्रश्नपत्रिका संच, चालु घडामोडी, स्पर्धा परिक्षा शब्दकोडे, या सह मुलांच्या भविष्यासाठी उत्कृष्ट व खात्रीलायक माहिती देणारे महाराष्ट्राचे एकमेव वृत्तपत्र नौकरी एक्सप्रेस!
★ या वृत्तपत्राचा घरपोच अंक मिळविण्यासाठी वार्षिक वर्गणीदार व्हा. कार्यलयाच्या वतीने प्रत्येक सोमवारी अंक घरपोच पोस्टाने पाठविण्यात येईल.
नौकरी एक्सप्रेस वार्षिक वर्गणी दर – ७५०/– रूपये
सहामाहि वर्गणी – ४००/– रूपये
-: वर्गणीदारांनी आपली वर्गणी पाठविण्याचा पत्ता :-
नौकरी एक्सप्रेस मुख्य कार्यालय
प्लॉट नंबर- पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी,
एन ५ सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३
किंवा
नौकरी एक्सप्रेस या नावाने बँक ऑफ महाराष्ट्राच्या कोणत्याही शाखेतुन खाते क्रमांक 60122255284 या खात्यात भरणा करावी व सदरील भरणा केलेली पावती ई-मेल किंवा व्हॉट्सॲप नंबर- 9421281078 यावर पाठवावी.
Email-naukriexpress.impact@gmail.com
www.naukriexpress.co.in

# TA च्या 'या' रॅली कमांडो भरती

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** टेरीटोरियल आर्मी (TA) ग्रुप मुख्यालय साउदर्न कमांडने सोल्जर (जनरल ड्युटी), क्लर्क आणि ट्रेड्समन या पदांसाठी भरती रॅलीची घोषणा केली आहे, जी १५ नोव्हेंबर ते १ डिसेंबर दरम्यान आयोजित केली जाईल.

टेरीटोरियल आर्मी (TA) ग्रुप मुख्यालय साउदर्न कमांडने आपल्या कार्यक्षेत्रातील विविध इन्फंट्री बटालियनमध्ये भरतीसाठी अधिकृत अधिसूचना जारी केली आहे. या भरतीअंतर्गत सोल्जर (जनरल ड्युटी), क्लर्क आणि ट्रेड्समन या पदांसाठी रॅली आयोजित करण्यात येणार आहे. ही रॅली MARATHA LI, PARA, MADRAS, MAHAR, THE GUARDS, GRENADIERS आणि BIHAR रेजिमेंटमध्ये घेतली जाईल.देशसेवेची इच्छा असलेल्या पुरुष उमेदवारांसाठी ही एक उत्तम संधी आहे. पात्र उमेदवार आपल्या राज्यातील आणि केंद्रशासित प्रदेशातील ठरवलेल्या केंद्रांवर दिलेल्या तारखेनुसार रॅलीला उपस्थित राहू शकतात. १५ नोव्हेंबरपासून रॅली आयोजित करण्यात आली आहे. तर रॅली १ डिसेंबरपर्यंत समाप्त होणार आहे. उमेदवारांना भरतीसाठी लेखी परीक्षा पात्र करावी लागणार आहे. याची



तारीख अद्याप जाहीर करण्यात आली नाही.सगळ्यात आनंदाची बात म्हणजे या भरतीसाठी कोणतीही अर्ज फी आकारली जाणार नाही. सर्व प्रवर्गातील उमेदवार थेट रॅलीसाठी सहभागी होऊ शकतात. रॅलीच्या माध्यमातून १४२२ पदे भरण्यात येणार आहेत. ८वी/१०वी/१२ वी पास उमेदवारांसाठी ही भरती आयोजित करण्यात आली आहे. तसेच १८ ते ४२ वर्षे आयु असणारे उमेदवार या भरतीसाठी अर्ज करू शकतात. पात्र प्रवर्गातील उमेदवारांना सवलत टेरीटोरियल आर्मीच्या नियमांनुसार दिली जाईल. एकूण पाच टप्प्यांमध्ये उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.

शारीरिक चाचणी, ट्रेड टेस्ट, वैद्यकीय तपासणी, लेखी परीक्षा तसेच कागदपत्र पडताळणी या टप्प्यांच्या माध्यमातून ही भरती पार पडणार आहे. इच्छुकांना हे सर्व टप्पे पात्र करावे लागणार आहेत. अर्ज प्रक्रियेची काहीच गरज भासणार नाही. उमेदवारांना थेट रॅलीच्या ठिकाणी येऊन अर्ज करता येणार आहे. फक्त रॅलीकडे येताना 'शैक्षणिक प्रमाणपत्रे (मूळ व छायांकित प्रती), रहिवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, चारित्र्य प्रमाणपत्र, क्रीडा प्रमाणपत्र (असल्यास) तसेच अलीकडील २० पासपोर्ट आकाराचे फोटो' या डॉक्युमेंट्सला आणावे. बाकी नियुक्तीच्या प्रक्रियेच्या माध्यमातून ही भरती जाहीर करता येणार आहे.

# 'प्रधानमंत्री मत्स्य संपदा' योजनेअंतर्गत खोल समुद्रातील मासेमारी नौकांचे उद्घाटन

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री यांच्या हस्ते २७ ऑक्टोबर २०२५ रोजी माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड, मुंबई येथे खोल समुद्रातील दोन मासेमारी नौकांचे उद्घाटन होणार आहे. हा कार्यक्रम महाराष्ट्रातील समुद्री मत्स्य व्यवसायाच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

खोल समुद्रातील मासेमारी नौका प्रकल्प प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना (पीएमएमएसवाय) अंतर्गत राबविण्यात आला असून, यासाठी राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (एनसीडीसी) यांचे कर्ज स्वरूपात आर्थिक सहाय्य प्राप्त झाले आहे.

**माझगाव डॉक येथे २७ ऑक्टोबर रोजी कार्यक्रम**

या योजनेचा उद्देश महाराष्ट्रातील मच्छीमार सहकारी संस्थांची खोल समुद्रातील मासेमारी क्षमता वाढविणे, भारताच्या विशेष आर्थिक क्षेत्रातील (ईईझेड) ट्यूना व इतर सागरी संसाधनांना प्रोत्साहित करणे, तसेच मच्छीमारांचे उत्पन्न वाढविणे हा आहे.

राज्यातील सात सागरी जिल्ह्यांतील



१४ मच्छीमार सहकारी संस्थांची निवड या योजनेअंतर्गत करण्यात आली होती.

यातील जय मल्हार मत्स्यव्यवसाय विविध कार्यकारी संस्था, मुंबई शहर या संस्थेचा प्रस्ताव एनसीडीसी, दिल्ली यांच्याकडून मंजूर झाला आहे. प्रकल्प सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामार्फत राबविण्याच्या निर्देशानुसार या नौकांचे बांधकाम उडुपी कोची शिपयार्ड लिमिटेड, मालपे (कर्नाटक) येथे करण्यात आले आहे.

प्रत्येक नौका १८ ते २२ मीटर लांबी, ४०० ते ६०० एचपी इंजिन क्षमता, स्टील हल (Hull) बांधणी, रेफ्रिजरेटेड फिश होल्ड, तसेच जीपीएस, इको साऊंडर, व्हीएचएफ रेडिओ, एआयएस आणि रडार यांसारख्या अत्याधुनिक नेव्हिगेशन व संप्रेषण प्रणालींनी सुसज्ज आहेत. या नौका १० ते १५ दिवसांच्या बहुदिवसीय मासेमारी मोहिमांसाठी योग्य असून, ट्यूना लाँगलाईन व गिलनेट ऑपरेशन्ससाठी सक्षम आहेत. सर्व सुरक्षा मानके डीजी शिपींग यांच्या नियमानुसार आहेत.

या प्रकल्पाचा एकूण खर्च २०.३० कोटी असून त्यामध्ये पुढील निधी घटकांचा समावेश आहे:

एनसीडीसी कर्ज सहाय्य: ११.५५ कोटी

केंद्र हिस्सा : ४.०३ कोटी

राज्य हिस्सा : २.६८ कोटी

लाभार्थी संस्था हिस्सा: २.०३ कोटी

या योजनेस केंद्र शासनाकडून दि. २७ मार्च २०२३ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

या दोन नौकांच्या उद्घाटनामुळे महाराष्ट्रात खोल समुद्रातील शाश्वत मासेमारीचा नवा अध्याय सुरू होणार असून –मच्छीमार सहकारी संस्थांना खोल समुद्रात बहुदिवसीय मासेमारी करता येईल, किनारी मासेमारीवरील दडपण कमी होईल, डीप सी ट्यूना फ्रॉम महाराष्ट्र या उपक्रमांतर्गत ट्यूना निर्यातीस चालना मिळेल, ब्लू इकॉनॉमी सशक्त होईल, आणि किनारी मच्छीमारांचे उत्पन्न वाढेल.

हा प्रकल्प आधुनिक मासेमारी तंत्रज्ञान, शीतसाखळी सुविधा व सहकारी व्यवस्थापनाच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी – विशेषतः एसडीजी १२ (जबाबदार उपभोग व उत्पादन) आणि एसडीजी १४ (पाण्याखालील जीवन) – सुसंगत आहे. त्यामुळे पर्यावरणीय समतोल राखत मच्छीमारांच्या उपजीविकेचे शाश्वतीकरण साध्य होणार आहे.

# बारावीच्या बोर्ड परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ, दहावीच्या तारखाही वाढण्याची शक्यता

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/**बारावीच्या परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम मुदत आता ३ नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. विलंब शुल्कासह हे अर्ज सादर करता येतील. दहावीच्या अर्जांसाठीही मुदतवाढ मिळण्याची शक्यता आहे. प्रात्यक्षिक परीक्षा २३ जानेवारीपासून सुरू होतील, तर लेखी परीक्षा फेब्रुवारी–मार्चमध्ये होतील. सर्व विद्यार्थ्यांना सोयीस्कर व्हावे यासाठी हा निर्णय. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेचे अर्ज भरण्याकरिता ३ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विलंबशुल्कासह हे अर्ज सादर करावे लागणार आहेत. याआधी, विद्यार्थ्यांनी २० ऑक्टोबरच्या आत परीक्षांचे अर्ज भरावयाचे होते.

राज्य मंडळाची बारावी आणि दहावीची शालांत परीक्षा फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात होणार आहे. या परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे अर्ज ऑनलाइन पद्धतीने भरावयाचे आहेत. कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत



यु–डायस आणि पीईएन–आयडी वापरून हे अर्ज मंडळाकडे सादर करण्यात येतील. व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेंतर्गत तसेच तुरळक किंवा आयटीआयचे विषय घेऊन प्रविष्ट झालेले विद्यार्थी यांना या परीक्षेचे अर्ज कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत भरावयाचे आहेत.

त्यासाठी आता, नियमित शुल्कासह ३ नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरता येतील. नियमित व विलंब शुल्काने अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क मंडळाकडे जमा करण्यासाठी ७ नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रीलिस्ट विभागीय मंडळांकडे जमा करण्यासाठी १० नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. दरम्यान, दहावीचे अर्ज भरण्यासाठी २७ ऑक्टोबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना आणि कनिष्ठ महाविद्यालयांना अर्ज भरणे सोयीचे व्हावे याकरिता ही मुदतदेखील वाढविली जाण्याची शक्यता आहे.दहावी आणि बारावीच्या परीक्षेला खासगीरीत्या फॉर्म क्रमांक १७ भरून प्रविष्ट होण्यासाठी १५ ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. आता विलंबशुल्कासह ३१ ऑक्टोबरपर्यंत हे अर्ज सादर करता येतील. बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च आणि दहावीची लेखी परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान होईल. प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापन तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षांच्या तारखाही यापूर्वीच घोषित झाल्या आहेत. बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा २३ जानेवारी ते ९ फेब्रुवारीदरम्यान तर दहावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा २ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारीदरम्यान घेण्यात येतील.

# राज्यातील ८ महाविद्यालये बंद होण्याची शक्यता

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी/** महाराष्ट्रात कृषी शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा कल कमी झाला आहे. यंदा कृषी अभ्यासक्रमांच्या सुमारे तीन हजार जागा रिक्त राहिल्या आहेत. यामुळे नव्याने सुरू झालेली आठ महाविद्यालये बंद पडण्याची शक्यता आहे. सरकारी संस्थांमध्ये प्रवेशाचा टक्का जास्त आहे, तर खासगी संस्थांमध्ये कमी आहे. अभ्यासक्रमात आधुनिक बदलांचा अभाव आणि रोजगाराच्या संधी कमी असल्याने विद्यार्थी इतर शाखांकडे वळत आहेत.

**-कृषी शिक्षणाबद्दल मोठी बातमी!**
**-हजारो जागा रिक्त**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी स्थिर करिअर देणारे आणि शेतीत नवे तंत्रज्ञान आणणारे कृषी शिक्षण विद्यार्थ्यांच्या पसंतीतून मागे पडत असून, यंदा सुमारे तीन हजार जागा रिक्त राहिल्या आहेत. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळत नसल्याने, नव्याने सुरू झालेली आठ महाविद्यालये बंद पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, गेल्या वर्षीच्या तुलनेत प्रवेश किंचित वाढल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते.

'सीईटी सेल'कडून प्रथम वर्ष पदवी कृषी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया नुकतीच संपली. राज्यातील कृषी अभियांत्रिकी, फूड टेक्नॉलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, कम्युनिटी सायन्स, फॉरेस्ट्री, हॉर्टिकल्चर अशा अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी गेल्या वर्षी प्रवेशासाठी १८ हजार २०७ जागा उपलब्ध होत्या. त्यापैकी १३ हजार ६५६ जागांवर प्रवेश झाले होते. यंदा प्रवेशांमध्ये थोडी वाढ झाली आहे. यंदा प्रवेशासाठी १६ हजार ८२९ जागा उपलब्ध होत्या. यापैकी १३ हजार ८९२ जागा भरल्या गेल्या असून, दोन हजार ९३७ जागा रिक्त राहिल्या आहेत. त्यामुळे प्रवेशाचा टक्का ८२.५५ एवढा आहे. सरकारी संस्थांमध्ये ९५.३२ टक्के, तर खासगी संस्थांमध्ये ७९.२२ टक्के जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत.

अशी परिस्थिती असली, तरी राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी या विद्यापीठांशी संलग्न असलेल्या काही महाविद्यालयांमध्ये अत्यंत कमी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत.

वृत्त पान नं...

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2010/34125
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813